# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. २५/०२/२०१०

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक २५/०२/२०१० रोजी सभा सुचना क्र. २० दि. १८/०२/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. दिनेश नलावडे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दिनेश दगडू नलावडे | -- | सभापती |
| २) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | -- | सदस्या |
| ३) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | -- | सदस्य |
| ४) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| ५) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| ६) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| ७) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |
| ८) | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी | -- | सदस्य |
| ९) | श्री. चंद्रकांत म्हात्रे | -- | सदस्य |
| १०) | सौ. सुधा व्यास | -- | सदस्या |
| ११) | सौ. वर्षा भानुशाली | -- | सदस्या |
| १२) | श्री. बर्नट अल्बर्ट डिमेलो | -- | सदस्य |
| १३) | सौ. अनिता ज. पाटील | -- | सदस्या |

**गैरहजर सदस्य –**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| २) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. २५/०२/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. २०, दि. १८/०२/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**याकुब कुरेशी :-**

त्या अगोदर एक ठराव मांडू इच्छितो. आत्ताच झालेल्या मा. महापौरांच्या इलेक्शनमध्ये संयुक्त आघाडी व राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्या वतीने निवडून आलेले नवनिर्वाचित मा. महापौरांची निवडणूक झाली आणि श्री. तुळशीदास म्हात्रे हे मा. महापौर पदी विराजमान झाले त्याबद्दल मी ठराव मांडत आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेसचे श्री. स्टीवन मेन्डोंसा यांची उपमहापौर पदी नेमणूक झाल्याबद्दल मी ठराव मांडत आहे.

**हेलन गोविंद :-**

माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. १०४ :-**

आत्ताच झालेल्या मा. महापौरांच्या इलेक्शनमध्ये संयुक्त आघाडी व राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्या वतीने निवडून आलेले नवनिर्वाचित मा. महापौरांची निवडणूक झाली आणि श्री. तुळशीदास म्हात्रे हे मा. महापौर पदी विराजमान झाले त्याबद्दल तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे श्री. स्टीवन मेन्डोंसा यांची उपमहापौर पदी नेमणूक झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. याकुब कुरेशी** **अनुमोदक :- श्रीम. हेलन गोविंद**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**चंद्रकांत म्हात्रे :-**

सभेला सुरूवात होण्यापूर्वी मी मागच्या मिर्टींगलापण सांगितले होते की, शांतीनगर सेक्टर नं. ५ मध्ये एका मंदिराचे बांधकाम झाले होते. आणि त्या मंदिराच्या बांधकामामध्ये मी त्यांना तक्रारपण केली होती की, तिथे ते आवार पूर्वी मंदिरापुरतेच होते. आत्ता दिवसेंदिवस ते पाच फुटाचे होते ते दहा फुट झाले, वीस फुट झाले, पंचवीस फुट झाले. असे मोठ्या प्रमाणात बांधकाम या शुक्रवार, शनिवार आणि रविवारच्या मध्ये झालेले आहे. मा. सभापती साहेब, आपल्या परवानगीनेच बोलतो. जरा ऐकून घ्या. महत्वाची बाब आहे. कारण ते प्रस्थ वाढत चालले आहे. आतमध्ये कंम्पाऊंन्डचे बांधकामपण रात्रंदिवस करून सुरू करतात. रात्री काम सुरू करतात, सकाळी संपवतात. आणि दुसरी गोष्ट, सेक्टर ६ मध्ये जो गुरूव्दारा आहे. तिथेसुध्दा गार्डनची जागा होती. त्या गार्डनच्या जागेमध्ये गुरूव्दारा बांधला. तर आमची त्याला काही हरकत नव्हती की, एक धार्मिक बाब आहे. परंतु, आत्ता त्यांनी कंम्पाऊन्डच्या आवारामध्ये दहा ते पंधरा रूमचे बांधकाम केले आहे. त्याच्यामुळे जे आजुबाजूचे सोसायटीवाले आहेत. त्यांना फार त्रास होतो. कारण ते बांधकाम एवढे मोठे केलेले आहे की, त्यांना जी मोकळी जागा, त्यांनी जे फ्लॅट परचेस केले होते ते हवेच्या दृष्टीकोनातून केले होते की, गार्डन आहे. आणि गार्डनमध्ये व्यवस्थित हवा येईल. आत्ता त्यांना प्रकाशपण येत नाही असे त्यांनी गुरूव्दारामध्ये बांधकाम केलेले आहे. कमीत कमी पंधरा ते वीस रूम बांधलेले आहेत.

**मा. सभापती :-**

साहेब, श्री. म्हात्रे साहेब ज्या मंदिराबद्दल सांगत आहेत. त्याला महानगरपालिकेने काही परमिशन दिलेले आहे का?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

काहीच नाही.

**मा. आयुक्त :-**

परमिशन दिलेली नाही.

**मा. सभापती :-**

परमिशन नाही तर आपण अगोदर ठरावात नक्की केलेले आहे. मंदिर बांधत असतील तर त्याला परमिशन घेतल्याशिवाय मंदिर वगैरे बांधू नयेत. असा प्रकार चालू असेल तर एकदा मंदिर झाल्यानंतर तो प्रश्न जातीवादावर जातो. ताबडतोब कार्यवाही होत नाही. त्यांनी अगोदरच कम्पलेंट केलेली आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

श्री. गणेश पाटील यांनी त्यांना सांगितले होते की, मुर्ती ठेवून द्या.

**मा. सभापती :-**

साहेब, याच्या अगोदर आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये श्री. मिलन म्हात्रेंनी भरपूर प्रश्न उपस्थित केलेले आहेत. अशी मंदिरे जागोजागी कॉर्नरवर झाली आहेत, ती तोडण्यासाठी फार अडचण येते. त्याचवेळेला हे काम झाले पाहिजे. आणि त्या प्रभाग अधिका-यांची ही जबाबदारी आहे. प्रत्येक वेळेला आपण या ठिकाणी विषय उपस्थित करायचा हे बरोबर नाही.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

पंचवीस फुटाची शेड बांधली आहे.

**मा. सभापती :-**

कोणाचेही असो. परत ते तोडताना लोकांची भावना दुखावली जाते.

**मा. आयुक्त :-**

आठ दिवसामध्ये बेकायदेशीर बांधकाम काढले जाईल.

**वर्षा भानुशाली :-**

साहब, अतिक्रमण विभाग को ०६/०१ को लेटर दिया हुआ है। अब आपने बोर्ड मारके रखा है की, ०७ दिन मे कार्यवाही करेंगे। इसको करीबन ०१ महिने के उपर होने को आया है। लेकिन अब तक किया नही है। एक सोसायटी का लेटर है, उसने दरवाजा बाहर निकालकर रखा है। उसने लेटर दिया है, तो उसके उपर आपके अधिकारियों ने क्या कार्यवाही किया है? गोडदेव नाकेपर बिल्डींग है। वहापर उन्होने पिछेसे दरवाजा निकाला हुआ है। जब उन्होंने अतिक्रमण मे लेटर दिया है, तो आपके अधिकारी लेटर देखते ही नही है क्या? ऐसे लेटर आया तो रख दिया। ऐसे तो कोई बिल्डींग का पिलर भी निकाल देगा। कोई पुरानी बिल्डींग होगी, कल गिर जाएगी तो आप क्या करोगे? उसका जिम्मेदार फिर कौन रहेगा? सर ऐसा छोटा छोटा भी हमे स्टॅंडींग कमिटी मे लाना पडता है। तो अधिकारी क्या कर रहे है?

**मा. आयुक्त :-**

आज जरा सेन्सस का काम है।

**वर्षा भानुशाली :-**

यह ठिक है। लेकिन जब यह अधिकारी के पास पहूचता है, तो अधिकारी लेकर साईड मे रख देता है। उसका कुछ जिम्मेदारी नही है क्या? सिर्फ बडे-बडे अतिक्रमण हो रहे है या कही कुछ हो रहा है, उसके उपरही अधिकारी का ध्यान जाता है। इस लेटर पर कुछ भी नही।

**मा. सभापती :-**

मॅडम हो जाएगा।

**चंद्रकांत मोदी :-**

मा. सभापती साहेब, मै भी दो मिटींग से बोल रहा हू। जो मस्जीद के पास भाजीवाले है, जो जैन मंदिर के पास है। मंदिर का लेटर था। कम्प्लेंट किया था। आप ने भी आज्ञा किया था,लेकिन कुछ हुआ नही। पहले श्री. खेत्रे साहब प्रभाग अधिकारी थे, उसके बाद यह साहब आये। इन्होने बोला दो दिन मे करता हू। श्री. खेत्रे साहब ने बोला, आजही करता हू। लेकिन उन्होने भी नही किया। आप अब भी मिटींग के बाद जाकर व्हिजीट कर सकते है।

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, बोलण्यापूर्वी मा. स्थायी समितीमध्ये आमच्या नवीन मेंबर आलेल्या श्रीम. निर्मला सावळे मॅडम यांचे अभिनंदन करतो आणि स्वागत करतो. साहेब, विषय कसा सुरू करणार? मागच्या प्रत्येक मिटींगमध्ये तुम्ही आश्वासन देता की, इथे जे अधिकारी गैरहजर असतील त्यांच्यावर आम्ही कार्यवाही करणार. इथे किती डीएमसी हजर आहेत? किती अधिकारी हजर आहेत? तुमचे अतिक्रमण निर्मुलन, फेरिवाले हटाव, हे सर्व अधिकार तुम्ही प्रभाग अधिका-यांना दिले आहेत. किती वॉर्ड ऑफीसर आज हजर आहेत?

**मा. आयुक्त :-**

त्यासाठीच तुम्हाला सांगतो की, या मिटींगमध्ये ते उपस्थित राहू शकणार नाहीत. ई-गव्हर्नन्सची, ई-टेंडरींगची मिटींग होती. मला मिटींगला बोलावले होते. त्यामुळे श्री. पानपट्टेंना तिकडे पाठवले. घनकचरा व्यवस्थापनाची केस उभी राहणार, ते ॲफीडेव्हीट करायला श्री. राऊत यांना पाठवले. आणि नवीन जनगणना सुरू झाली त्यामध्ये झोपडपट्टीचा रिपोर्ट दोन दिवसांमध्ये आजपर्यंत सर्व्हे करून रिपोर्ट करायचा आहे.

**अनिल सावंत :-**

त्यासाठी वॉर्ड ऑफीसर गेले आहेत का?

**मा. आयुक्त :-**

वॉर्ड ऑफीसर.....

**अनिल सावंत :-**

साहेब, स्टॅंडींग कॅन्सल करून नंतर बोलवायची होती.

**मा. आयुक्त :-**

आज रात्री आठ वाजेपर्यंत कम्प्लीट करायचे आहे. म्हणजे आम्ही जे स्टॅंडींग कमिटीमध्ये सांगतो आणि गैरहजर लोकांवर कार्यवाही करत नाही, असा प्रश्न नाही.

**अनिल सावंत :-**

साहेब, याच्यापूर्वी कुठे कार्यवाही केली? कोणत्या अधिका-यावर कार्यवाही केली ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

याच्यापूर्वी झालेली नाही. परंतु कारणाव्यतिरिक्त हजर न राहिलेले अधिकारी कोण आहेत?

**अनिल सावंत :-**

आत्ता डीएमसी श्री. राऊत साहेब किती दिवस झाले गैरहजर आहेत? आज गेले आहेत. ते कधीही पालिकेमध्ये नसतात. किती दिवस झाले?

**मा. आयुक्त :-**

मा. हायकोर्टामध्ये घनकच-याचे पी.आय.एल. झाले आहे.

**अनिल सावंत :-**

पी.आय.एल. ला एक दिवस डेट असेल. आज जवळ-जवळ दहा-बारा दिवस ते केबिनला नाहीत. तुम्ही रेकॉर्ड चेक करा.

**मा. नगरसचिव :-**

मा. सभापती साहेब, नवनिर्वाचित स्थायी समिती सदस्याचें पुष्पगुच्छ देऊन स्वागत करीत आहेत.

**निर्मला सावळे :-**

आदरणीय आमदार श्री. मुझफ्फर हुसैन साहेब, तसेच संयुक्त लोकशाही आघाडी, उपस्थित असलेले स्टॅंडींगचे मा. सभापती, सर्व मेंबर यांना मी माझी निवड केल्याबद्दल धन्यवाद देते.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, गेल्या सप्टेंबरमध्ये आपला हॉकर्स नो-हॉकर्स झोनचा ठराव झाला आणि त्यामध्ये शनिवार बाजार आणि सोमवार बाजार कायम स्वरूपी बंद करावा. त्यानंतर तुम्हीसुद्धा ब-याच वेळा इन्स्ट्रक्शन दिलेल्या आहेत. आजसुध्दा तो सोमवार बाजार चालू आहे. प्रभाग अधिका-यांना विचारा. उलट तो वाढला आहे. काय कार्यवाही केली ते जरा विचारा.

**सुनिल यादव ( प्रभाग अधिकारी क्र. ०४) :-**

कार्यवाही चालू आहे.

**अनिल सावंत :-**

कुठे कार्यवाही चालू आहे. तुम्ही स्टॅंडींग कमिटीमध्ये काहीही स्टेटमेंट देता. संपूर्ण चार नंबर, पाच नंबर, तीन नंबर पूर्ण त्यांनी कवर केला. काल मी मा. सभापतींना संध्याकाळच्या वेळेला घेऊन आलो. तो १०० फुट रोड, एका बाजूला पूर्ण जाम झालेला आहे. हातगाड्या, हॉकर्स पूर्ण. मा. सभापतींना मी दाखवले. तुम्ही कोणत्या रोडवर कार्यवाही केली?

**सुनिल यादव :-**

मुख्य रस्त्यावर.

**अनिल सावंत :-**

१०० फुट? १०० फुट रस्ता तर कधीच शिफ्ट झाला आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, सिर्फ १०० फुट पर मिरा भाईंदर महानगरपालिका की गाडी खडी रहती है। बाकी कोई नही रहता है। मैने खुद देखा है।

**अनिल सावंत :-**

संपूर्ण सेक्टर-२, सेक्टर-१, सेक्टर-३, सेक्टर-४, सेक्टर-५ पर्यंत ते आले आहेत. हे तिकडचे स्थानिक नगरसेवक आहेत. यांना विचारा.

**सुनिल यादव :-**

गाड्यापण उचललेल्या आहेत.

**अनिल सावंत :-**

त्यांच्या गाड्या नसतात. ते सोमवार बाजार रस्त्यावर लावतात. यावरून कळते की, तुम्ही काय कार्यवाही केली आहे. तुम्ही ज्या गाड्या सांगता. ते रस्त्यावर धंदा लावतात. सोमवार बाजार रस्त्यावर लागतो याची तरी तुम्हाला माहिती आहे का?

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, जो श्री. पराडकर का नाम बोला है, पराडकर पहले से मॅसेज देता है की, गाडी आनेवाला है।

**अनिल सावंत :-**

सोमवार बाजारवर कार्यवाही होणार की, नाही?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

श्री. यादव साहेब, सोमवार बाजाराच्या गोष्टी चाललेल्या आहेत. सोमवार बाजार वाढत चाललेला आहे.

**सुनिल यादव :-**

तिनही सोमवार बाजारांवर आम्ही कार्यवाही केलेली आहे.

**अनिल सावंत :-**

कोणकोणत्या?

**सुनिल यादव :-**

मी चार्ज घेतला तेव्हापासून तिन्ही सोमवार बाजार, एक वेळ पोलिस मिळाले नाहीत, त्यावेळीसुध्दा आम्ही केली.

**अनिल सावंत :-**

तुम्ही पूर्ण खोटी स्टेटमेंट देता. तुम्ही सोमवारच्या दिवशी मला जाऊन दाखवा.

**मा. सभापती :-**

साहेब, आत्ता तिकडे प्रभाग अधिकारी कोण आहेत.

**अनिल सावंत :-**

साहेब, पराडकरवर टाकून नाही. जबाबदारी यांची आहे? यांना अगोदर विचारा कि, यांना हॉकर्स, नो-हॉकर्स झोनचा ठराव तरी माहिती आहे का?

**मा. आयुक्त :-**

ज्यो लोकांनी कार्यवाही केली नाही त्यांच्यावर कार्यवाही केली जाईल. यापुढे असे बसणार नाहीत याची व्यवस्था केली जाईल.

**अनिल सावंत :-**

साहेब, सोमवार बाजार कायम स्वरूपी बंद व्हायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब, हा अतिक्रमणाचा विषय आहे म्हणून मी थोडे बोलतो. मा. आयुक्त साहेब, तुमचे लक्ष केंद्रीत करतो. शांती नगर स्टेशन जवळ स्टार गेट, शांतीनगरचा जो गेट होता, तो परिसर पूर्ण मोकळा करायला मा. आमदार श्री. मुजफ्फर हुसैन साहेब, स्वतः तिकडे उभे होते. तेव्हाचे तत्कालीन आयुक्त श्री.

गायकवाड साहेब, सर्वांनी म्हणजे पूर्ण महापालिकेची यंत्रणा त्या दिवशी काम करायला लावली होती. परिसर स्वच्छ केला होता. गेट तोडले होते. तिथले पूर्ण अतिक्रमण हटवले होते आणि त्या दिवशी मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसेन साहेबांची एन्जोग्राफी झाली. तरीही ते दुसऱ्या दिवशी सकाळी तिकडे येऊन उभे राहिले आणि ते काम पूर्ण करून घेतले होते. आज त्या शांतीनगरला स्टेशनजवळ जाऊन बघा, तिकडे काय अवस्था आहे? कोण अतिक्रमण हटवतो? स्टेशनजवळ तर अतिक्रमण नसलेच पाहिजे. ते कोर्टाचे आदेश आहेत. तुमचे अतिक्रमण पथक जे आहे, ते किती काम करते हे स्पष्ट आहे. रात्री नऊ वाजेपर्यंत काम करायचा त्यांचा टाईम आहे. त्यांना टाईम दिलेला आहे. पण तिकडे कोणी नसतात. साहेब स्टेशनजवळ फेरिवाले संध्याकाळीच बसतात. दुपारी बसत नाहीत. किंवा सकाळी बसत नाहीत. ते संध्याकाळी बसतात. फ्रुटवाले, भाजीवाले, मच्छीवाले सर्व संध्याकाळी येऊन बसतात.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे, दररोज संध्याकाळी कार्यवाही करू. आणि यापुढे सोमवार बाजार आणि दररोज संध्याकाळी तिथे स्टाफ ठेवू. आणि केले नाही तर त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, सन्मा. सदस्य महापालिकेत बसतात. मा. स्थायी समितीमध्ये बोलतात, मा. महासभेमध्येसुध्दा या विषयाबद्दल बोलतात. अधिकारी वर्ग त्याला दुर्लक्ष करतात. तुम्हाला एक छोटेसे उदाहरण सांगतो. आमच्या नयानगरच्या परिसरामध्ये एका सोसायटीमध्ये एक सोसायटीचे ऑफीस कार्यालय, तो त्यांचा अधिकार आहे. डीसीआर प्रमाणे त्यांना अधिकार आहे, त्यांचे सोसायची कार्यालय ते करू शकतात. हे आपले वॉर्ड अध्यक्ष श्री. यादव साहेब, तिकडे जाऊन त्यांनी बाजूच्या सोसायटीने. त्या सोसायटीचे काही लेणं नाही देणं नाही, त्यांच्या तक्रारीवर त्या सोसायटीचे कार्यालय तोडून टाकले.

**मा. आयुक्त :-**

परवानगी नसेल तर तोडणार.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, मला सांगा त्या परवानगीचे टीसीआर मध्ये Due course of law असतो. कमीत कमी तुम्हाला त्यातील, प्रथमदर्शनी आपण जी वस्तू बघतो, एक सोसायटीचे कार्यालय तिकडे आहे, ते दुकान नाही.येणारा तक्रारदार बाजूच्या सोसायटीचा आहे. त्याचे काही लेने-देणे नाही. या तक्रारीला इमिजिएट ॲक्शन चालू असताना.

**मा. आयुक्त :-**

परत बांधल्यानंतर....

**जुबेर इनामदार :-**

पण साहेब, टीसीआर मध्ये त्याचे प्रोव्हीजन आहे ना? त्यांना Due course of law मध्ये त्यांना नोटीस द्या. त्या सोसायटीचा हक्क त्या जागेवर नाही. त्यांची तक्रार आली त्यांना काही अडचण नाही.

**मा. आयुक्त :-**

मुळात या महापालिकेतील हद्दीमध्ये जी बांधकामे चालतात ती स्टे-वर चालतात.

**जुबेर इनामदार :-**

इथे स्टेचा प्रश्नच येत नाही. डीसीआर मध्ये त्यांना अधिकार आहे.

**मा. अयाुक्त :-**

अगोदरच तोडले.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, सोसायटी ऑफीस किंवा बाऊन्ड्री वॉल हा त्यांचा अधिकार आहे ना?

**मा. आयुक्त :-**

सोसायटी ऑफीस अधिकार नाही. परवानगी घेतल्यानंतर....

**जुबेर इनामदार :-**

त्यांच्याकडे परवानगी होती, नव्हती हे सुध्दा विचारायला ते गेले नाहीत.

**मा. आयुक्त :-**

परवानगी नव्हती म्हणून त्यांनी तोडले.

**जुबेर इनामदार :-**

त्यांना विचारायला नोटीस दिलेली का?

**मा. आयुक्त :-**

नोटीस घ्यायला नकार दिला म्हणून लगेच तोडले.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, सोसायटीचे चेअरमेन, सेक्रेटरी कोणीही उपस्थित नव्हते सर्व नोकरीवाली माणसे आहेत. लोक कामावर गेलेले. त्यांच्याकडे परवानगी होती.

**मा. आयुक्त :-**

परवानगी नव्हती. परवानगी दाखवा मग आम्ही बांधून देऊ.

**जुबेर इनामदार :-**

त्यांनी परवानगीची प्रोसेस सुरू केलेली. त्यांना Due course of law प्रमाणे नोटीस बजावता आली असती. त्यांना नोटीस दिली नाही. साहेब, तुम्ही प्रशासनाचे संरक्षण करता, अधिका-यांचे संरक्षण करता.

**मा. आयुक्त :-**

संरक्षणाचा संबंध नाही. तुम्ही एक काम केले नाही म्हणून दुस-या कामाचा वचपा काढता. म्हणजे हे सोसायटीचे ऑफीस राहिले असते तर तुम्ही बाजाराचे बोलले नसते.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही सरसकट करताना तुमच्या अधिका-यांनी .....

**मा. आयुक्त :-**

म्हणजे हे सोसायटीचे ऑफीस तोडले म्हणून.

**अनिल सावंत :-**

साहेब, तो विषय वेगळा आहे. सोमवार बाजारामध्ये लोकांना एवढा त्रास आहे. त्याचा कोणालाच फायदा नाही. हा विषय वेगळा आहे. त्याला तुम्ही इंटरकनेक्ट करू नका.

**मा. आयुक्त :-**

इंटरकनेक्ट म्हणजे, याचा अर्थ असा, आम्ही तुम्हाला सांगितलेले की, आम्ही दररोज कार्यवाही करू.

**अनिल सावंत :-**

जर कारवाई केली असती तर आम्हाला बोलण्याचा प्रश्नच राहिला नसता.

**मा. आयुक्त :-**

ह्यांनी सोसायटीची कार्यवाही केली.....

**अनिल सावंत :-**

जे इलिगल प्रकरण आहे ते तुम्ही कायदेशीर हाताळता.

**जुबेर इनामदार :-**

जी वस्तू लोकांना त्रासदायक आहे, त्याच्यावर कार्यवाही होत नाही. आणि ज्याच्यामुळे काहीच त्रास नाही, त्याच्यावर कार्यवाही करायची?

**मा. आयुक्त :-**

लोक असेच म्हणत होतेज्यावेळेला काशिमिरा रोड बनला त्यावेळेला दोन्ही बाजूला कॉलम टाकून वर टॉवर बांधू. कोणालाच काही त्रास होणार नाही असे म्हणत होते. खालून गाड्या जाउ द्या.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, ती इमारत झाली. हे तर सोसायटीच्या आतील ऑफिस आहे.

**मा. आयुक्त :-**

काहीच त्रास होणार नाही, म्हणजे होउ द्यायचे का?

**जुबेर इनामदार :-**

लोक सात माळ्याचे टॉवर बांधतात त्याचे काय?

**मा. आयुक्त :-**

हे बघा तुमचे जे क्वेश्चन आहेत, यापुढे आम्ही ते स्ट्रीक्टली पाळू. आणि ते पाहू.

**निर्मला सावळे :-**

मा. आयुक्त साहेब, वॉर्ड क्र. ३३ भोला नगरच्या पाठीमागे जी महानगरपालिकेची गार्डन रिझर्व्हेशनची जागा आहे, त्याच्यामध्ये तीन महिन्यांपासून फार मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. त्या वॉर्डची नगरसेविका म्हणून मी तीन महिन्यांपासुन मागणी करत आहे की, लवकरात लवकर ते अतिक्रमण काढून घ्यावे. कारण इतर लोक येउन तिथल्या स्थानिक लोकांना फार मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. कारण पाणी टंचाई आणि तिथे फार मोठ्या प्रमाणात शौचालयाची व्यवस्था नसल्यामुळे पुर्ण रस्ता दुर्गंधी झालेला आहे. अगोदर जे लोक राहतात त्यांना तिथे व्यवस्था अपुरी पडते आणि त्यात ही २००-२५० घरे झाल्यामुळे तिथे व्यवस्थेवर अधिक ताण येतो. त्यामुळे माझी आपल्याला अशी विनंती आहे की, तिथली झोपडपट्टी लवकरात लवकर हटवून आमची गार्डन रिझर्व्हेशनची जागा आम्हाला मोकळी करून द्यावी.

**मा. आयुक्त :-**

सॉल्टला कळवा.

**मा. सभापती :-**

साहेब, ते पाहणी करायला पाठवा.

**निर्मला सावळे :-**

आम्ही सॉल्टला तशी मागणी केलेली आहे. पण आपल्या महानगरपालिकेचे रिझर्व्हेशन आहे.

**मा. आयुक्त :-**

महापालिका सॉल्टवाले अॅरेंजमेंन्ट करतात, पोलिस बंदोबस्त घेतात आणि आम्हाला कळवतात.

**निर्मला सावळे :-**

साहेब, मग आपली काही जबाबदारी नाही का?

**मा. आयुक्त :-**

ते ज्यावेळेला मागणी करतात.....

**निर्मला सावळे :-**

आपल्या महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये ती जागा आहे. मग आपली काही जबाबदारी नाही का?

**मा. आयुक्त :-**

शासकिय जमिनीवरची जबाबदारी शासकिय लोकांनी पाळायची आणि आमचा अधिकारी आणि मशिनरी जातो. तुम्ही सॉल्टवाल्यांना तयार करा, आमची मशिनरी आणि मनुष्यबळ आम्ही देउ.

**मा. सभापती :-**

विषय चालू करा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३३, दि. १७/०७/२००९, दि. ३०/०७/२००९, दि. ०७/०८/२००९, दि. २४/०८/२००९ व दि. ०२/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

अपना जो प्रोसिडींग बनता है, तो उसमे जो शब्द बोले जाते है, उसके अर्थ का अनर्थ इसमे कुछ भी टाईप होता है। और उसको हम मंजुरी देते है। अब पान क्र. २३ पर देखिए, लास्ट मेरा पॅरेग्राफ है। आयुक्त के उपर क्यो नही हो रहा है। सब झोपडपट्टी बना रहे है, मेरा १०-१० मेंबर उसके उपर है। मतलब मेरे लोगों की झोपडपट्टी उसमे है। मै बोल रहा हु की, मेरे लोग झोपडपट्टी बनाकर बैठे है। और इसको मंजुरी मिल जाएगा आप लोग मेरे उपर एम.आर.टी.पी. लगा दो। और उसको मै ही मंजुरी देता हु। वो मेंबर के बदले लेटर है। मेरे १०-१० लेटर उसके उपर है।

**नगरसचिव :-**

दुरूस्ती हो जाएगी।

**मदन उदितनारायण सिंह :-**

और उसके निचेका आयुक्त का पॅरेग्राफ। मा. आयुक्त ने बोला है की, इन्करेक्टमेंट को बरसात के बाद निकालना है। इनकरेक्टमेंट का मतलब क्या है? वैसा ही पान क्र. २५ मिलन म्हात्रेजी ने बोला है की, त्याच्यात असेम्बली बच्चन आले, यह असेम्ब्ली बच्चन काहा से आ गया? यह जो स्पेलिंग मिस्टेक होता है इसको जरा सुधारा जाए।

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, मिटींग चालते वेळी स्टेनो किती असतात?

**नगरसचिव :-**

एकच.

**अनिल सावंत :-**

आपल्याजवळ मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये किती स्टेनो आहेत?

**नगरसचिव :-**

तीन.

**अनिल सावंत :-**

मग स्टॅंडींगच्या वेळेला दोन बसवत चला.

**जुबेर इनामदार :-**

प्रकरण क्र. १३३ (ठराव टाईप करणे)

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. १३३ :-**

दि. १७/०७/२००९, दि. ३०/०७/२००९, दि. ०७/०८/२००९, दि. २४/०८/२००९ व दि. ०२/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १०५ :-**

दि. १७/०७/२००९, दि. ३०/०७/२००९, दि. ०७/०८/२००९, दि. २४/०८/२००९ व दि. ०२/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३४, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी होणारी वाहतुकीची कोंडी दुर करण्यासाठी वाहतुक पोलिसांच्या मदतीस होमगार्ड उपलब्ध करून देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

हे होमगार्ड जे आपण पोलिसांच्या मदतीने करतो आहे. हे हत्ती पाळल्यासारखे आहे. त्याला विनाकारण खर्च होतो आहे. हे जे आत्ता पोलिसांच्या मदतीला आपण होमगार्ड नियुक्त करणार आहोत. त्याची काय आवश्यकता आहे? मला तर वाटत नाही की, त्याची काही आवश्यकता असेल. कारण आपण त्यांना फुकटचे पोसणार आहोत आणि विनाकारण तो खर्च अनाठायी आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेला येणार आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

अभी बीच मे मा. आयुक्त ने करवाढी का प्रस्ताव लाया था। करवाढी, पाणी भाव वाढी सबमे भाववाढ।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आपण एकीकडे बचत करायला जातो आणि एकीकडे खर्च वाढवतो आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

अपने पास पगार देने के लिए पैसा नही है इसलिये कर बढा रहे है। उपर से यह ज्यादा बोझ महापालिका के उपर क्यो लाद रहे है।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

होमगार्डचे काही कामच नाही.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब, ही मागणी कोणाची आहे?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

ही मागणी कोणी केलेली आहे? हा अनाठायी खर्च आहे. हे पांढरा हत्ती पाळल्यासारखे आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

ट्राफिकची अडचण आहे तर सहा महिन्यांसाठी प्रायोगिक तत्वावर घेतले तर बरे होईल.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

त्याचा काही उपयोग नाही.

**चंद्रकांत मोदी :-**

वह लोग ट्राफिक बढायेंगे।

**शिवाजी बारकुंड :-**

पुणे, ठाणे सगळ्या कॉर्पोरेशनमध्ये ट्राफिक पोलिसांकडे पोलिस संख्या कमी असल्याने.....

**चंद्रकांत म्हात्रे :-**

उद्या ते होमगार्ड बसवणार आणि ते पळून जाणार.

**चंद्रकांत मोदी :-**

वो डायरेक्ट नही ले सकते है।

**शिवाजी बारकुंड :-**

सस्केस झाले नाही तर आपण ते बंद करू.

**मा. सभापती :-**

ईस्टमध्ये फार मोठा प्रॉब्लेम आहे. ह्याबाबतीत माझा थोडासा विरोध होता. मी इन्सपेक्टरशी बोललो. परंतु, आज नवघर नाका, बंदरवाडी नाका जहा एस.टी. वगैरे जो आती है, लोकल बस है, बी.एस.टी. की बस है। गोडदेव नाका, केबिन रोड, फेरीवाले हटाने बाद भी वहा पर दो मिनीट की जगह पर अधा घंटा, एक घंटा ट्राफिक हो जाता है। आम्हाला काशिमि-याला निघताना साईबाबा मंदिरापर्यंत निघायचे असेल तर वीस मिनिट अगोदरच निघावे लागते. ह्याठिकाणी जे काही ठराविक नाके दिलेले आहेत, ते थोडे कमीच आहेत. पण इस्टचा थोडा प्रॉब्लेम आहेच.

**याकुब कुरेशी :-**

मा. सभापती साहेब, माझे वैयक्तिक असे मत आहे की, आपण यांना तीन महिने ट्रायल बेसीसवर....

**मा. सभापती :-**
तीन चार महिने आपण यांना ट्रायल बेसिसवर ठेवू.
**मदन उदितनारायण सिंग :-**
पण किती ठेवायचे आहेत? आपल्याला पन्नासची गरज आहे का? इथे पन्नास दिले आहेत.
**याकुब कुरेशी :-**
जो पॉईंन्ट दिए है। हम तीन महिने के लिए ले रहे है।
**मदन उदितनारायण सिंग :-**
यह जो पॉईंट दिये है, इसमे से भी कुछ प्वॉईंट पर जरूरत नही है।
**याकुब कुरेशी :-**
जरूरत नही है वहाँपर नही रखेंगे।
**मदन उदितनारायण सिंग :-**
जैसे सालासर नगर दिया है।
**मा. सभापती :-**
सालासर नगर के पास जरूरत नही है।
**मदन उदितनारायण सिंग :-**
नवघर रोड पर बंदरवाडी दिया। नवघर नाके पर फिर सालासर दिया है।
**मा. सभापती :-**
बी.पी. रोड नाका, गोडदेव नाका, साईबाबा मंदिर, विमल डेअरी के वहाँ पर....
**मदन उदितनारायण सिंग :-**
वहॉ जरूरत है। अब इधर बी.पी. रोड दिया है। बी.पी. रोड मतलब क्या?
**मा. सभापती :-**
बी.पी. रोड नाका आणि गोडदेव नाका.
**मदन उदितनारायण सिंग :-**
तो इसमे बी.पी. रोड नाका भी है और गोडदेव नाका भी है।
**मा. सभापती :-**
तो विजय पंजाब होटल के पास जरूरत नही है। सालासर नगर वेस्ट का है।
**मदन उदितनारायण सिंग :-**
पन्नास ची गरज आहे का? जितकी गरज आहे तेवढे घ्या १५-२० घ्या.
**अनिल सावंत :-**
मिरारोडचे पण ॲड केले आहेत.
**प्रविण पाटील :-**
मा. सभापती साहेब, याला अनुसरून एक विषय आहे. आपण आत्ता जे होमगार्ड नेमायचे ठरवतो आहे. त्याच्यामध्ये आपण शासकिय दराने ५० होमगार्ड घेणार आहोत. तर शासकिय दर काय आहे?
**दिपक खांबित :-**
१९८ रू. आहे.
**शिवाजी बारकुंड :-**
आठ तास.
**प्रविण पाटील :-**
१९८ X ५० केले तरी ९९०० रूपये होतात.
**बर्नट डिमेलो :-**
जर प्रायोगिक तत्वावर चालू करायचे असेल तर त्याच्यामध्ये एक सुचना आहे की, उत्तन नाक्याचा समावेश करावा.
**प्रविण पाटील :-**
गर्व्हनमेंर्टचा रेटप्रमाणेच आपण काढले तर ९९०० रूपये होतात आणि महिन्याचे २ लाख ९७ हजार रूपये होतात. मग त्या दराने घ्या. म्हणजे जेणेकरून जवळ जवळ १ लाख ५३ हजाराचा फरक पडतो.
**मदन उदितनारायण सिंग :-**
श्री. बारकुंड साहेब, हा जो साडेचार लाख प्रति महिना खर्च दिला आहे, म्हणजे वर्षाचे किती होणार?
**मा. सभापती :-**
आपण आत्ता तीन महिन्यांचे देतो आहे. तीन महिने के बाद वापस अपने पास सब्जेक्ट आएगा।
**मदन उदितनारायण सिंग :-**
फक्त तीन महिन्यांकरिता ना?

**मा. सभापती :-**

पाच महिन्यांचे घ्या.

**मदन उदितनारायण सिंग :-**

पाच कशाला तीन घ्या. तीन नंतर बघू.

**मा. सभापती :-**

आत्ता तीन महिने देउन आपण केव्हा येणार. त्यामध्ये एक महिना असाच जाईल. पाच महिन्यांमध्ये आपण प्रोसिजरमध्ये बघू. पाच महिन्यांचे घ्या.

**याकुब कुरेशी :-**

त्याच्यामध्ये आणखीन काही वाढ होत असेल. भाईंदर पोलिस स्टेशन समोर सुद्धा घ्या.

**मा. सभापती :-**

भाईंदर वेस्टचे पोलिस स्टेशन आहे तिथे थोडी आवश्यकता आहे. जिथे क्रॉसिंग आहे. त्या ठिकाणी आपल्याला ठेवावे लागेल.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. सभापती साहेब, एक सुचना मै मांडता हूँ। सुचना ऐसी है की, यह होमगार्ड हम रखेंगे उसमे कोई होमगार्ड गैरकानुनी काम, जैसे अतिक्रमण के साथ मिलकर भाजीवाले को बिठाने का काम करेगा लोगो को जगह देने का काम करेगा, उसके उपर सदस्यों का कम्प्लेंट आएगा तो पुरा पुरा ॲक्शन उसपर किया जाए, ऐसी मेरी सुचना है।

**मा. सभापती :-**

हो जाएगा।

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी वाहने, रहदारी व फेरीवाल्यांमुळे वाहतुकीची कोंडी होत असते. वाहतुक पोलिसांकडे असलेला स्टाफ अत्यंत अपूरा असल्याने वाहतुक पोलिस व पोलिस निरिक्षक पोलिस ठाणे यांनी ट्राफीक वॉर्डन महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्याची मागणी केलेली आहे. त्यानुसार व इतर खालील ठिकाणी ट्राफीक वॉर्डन नेमण्याची आवश्यकता आहे.

१) बंदरवाडी
२) खारीगांव नाका
३) गोडदेव नाका
४) भाईंदर फाटक रोड, साईबाबा मंदिराजवळ
५) विमल डेरी
६) नवघर नाका
७) गोल्डन नेस्ट नाका
८) विजय पंजाब हॉटेल नाका - भाजी मार्केट
९) बी.पी. रोड
१०) सालासर नगर
११) बॉम्बे मार्केट
१२) कै. रघूनाथ म्हात्रे मार्ग
१३) संतोष टॉकिज
१४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग
१५) मिरारोड सर्कल
१६) मिरारोड मच्छी मार्केट
१७) सुर्या शॉपिंग सेंटर, सृष्टी
१८) नवयुवान चौक
१९) शांतीनगर सेक्टर - ५ गणेश चौक
२०) शांतीनगर सेक्टर - ५ जैन मंदिर समोर
२१) शितल नगर चौक
२२) नरेंद्र पार्क चौक
२३) पुनम सागर हॉस्पीटल
२४) शांती पार्क देना बँक समोर
२५) शांतीनगर सेक्टर - ९ रिक्षा स्टॅण्ड
२६) भाईंदर (प.) पोलिस स्टेशन समोर
२७) उत्तन नाका
२८) शांतीनगर सेक्टर ४,५
२९) रस्साज सिनेमा

वरील ठिकाणी व इतरत्र एकूण ७० ट्राफिक वॉर्डन उपलब्ध करुन देण्याची मागणी आहे. तथापी ट्राफिक वॉर्डन ऐवजी ५० होमगार्ड शासकीय दराने उपलब्ध करुन दिल्यास सोयीचे होईल. तरी सदर ५० होमगार्ड शासकीय दराने प्रायोगिक तत्वावर ५ महिने कालावधीकरीता उपलब्ध करुन देण्यास व त्यांचे मासिक देयक महानगरपालिकेमार्फत वेळेवर प्रदान करण्यास तसेच सन २०१०-२०११ या वर्षाच्या अर्थसंकल्पात नविन लेखाशिर्ष निर्माण करुन आवश्यक ती तरतूद करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**बर्नट डिमेलो :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

हे किती महिन्यांसाठी? याची मुदत किती?

**अनिल सावंत :-**

प्रायोगिक तत्वावर.

**मदन उदितनारायण सिंग :-**

किती महिन्यांसाठी मुदत सांगा.

**अनिल सावंत :-**

प्रायोगिक तत्वावर पाच महिन्यांसाठी.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. १३४, ठराव दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. १३४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी होणारी वाहतुकीची कोंडी दुर करण्यासाठी वाहतुक पोलिसांच्या मदतीस होमगार्ड उपलब्ध करून देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. १०६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी वाहने, रहदारी व फेरीवाल्यांमुळे वाहतुकीची कोंडी होत असते. वाहतुक पोलिसांकडे असलेला स्टाफ अत्यंत अपूरा असल्याने वाहतुक पोलिस व पोलिस निरिक्षक पोलिस ठाणे यांनी ट्राफीक वॉर्डन महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्याची मागणी केलेली आहे. त्यानुसार व इतर खालील ठिकाणी ट्राफीक वॉर्डन नेमण्याची आवश्यकता आहे.

१) बंदरवाडी
२) खारीगांव नाका
३) गोडदेव नाका
४) भाईंदर फाटक रोड, साईबाबा मंदिराजवळ
५) विमल डेरी
६) नवघर नाका
७) गोल्डन नेस्ट नाका
८) विजय पंजाब हॉटेल नाका - भाजी मार्केट
९) बी.पी. रोड
१०) सालासर नगर
११) बॉम्बे मार्केट
१२) कै. रघूनाथ म्हात्रे मार्ग
१३) संतोष टॉकिज
१४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग
१५) मिरारोड सर्कल
१६) मिरारोड मच्छी मार्केट
१७) सुर्या शॉपिंग सेंटर, सृष्टी
१८) नवयुवान चौक
१९) शांतीनगर सेक्टर - ५ गणेश चौक
२०) शांतीनगर सेक्टर - ५ जैन मंदिर समोर
२१) शितल नगर चौक
२२) नरेंद्र पार्क चौक
२३) पुनम सागर हॉस्पीटल
२४) शांती पार्क देना बँक समोर
२५) शांतीनगर सेक्टर - ९ रिक्षा स्टॅण्ड
२६) भाईंदर (प.) पोलिस स्टेशन समोर
२७) उत्तन नाका
२८) शांतीनगर सेक्टर ४,५

२९) रस्साज सिनेमा

वरील ठिकाणी व इतरत्र एकूण ७० ट्राफिक वॉर्डन उपलब्ध करुन देण्याची मागणी आहे. तथापी ट्राफिक वॉर्डन ऐवजी ५० होमगार्ड शासकीय दराने उपलब्ध करुन दिल्यास सोयीचे होईल. तरी सदर ५० होमगार्ड शासकीय दराने प्रायोगिक तत्वावर ५ महिने कालावधीकरीता उपलब्ध करुन देण्यास व त्यांचे मासिक देयक महानगरपालिकेमार्फत वेळेवर प्रदान करण्यास तसेच सन २०१०-२०११ या वर्षाच्या अर्थसंकल्पात नविन लेखाशिर्ष निर्माण करुन आवश्यक ती तरतूद करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३५, पुर्नविनियोजनेस मंजुरी देणेबाबत. (परिवहन विभाग)

**बर्नट डिमेलो :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमात १) बंदरवाडी मनपा शाळेसमोर, नवघर रोड, भाईंदर (पूर्व), २) एस.टी. स्टॅन्ड जवळ, भाईंदर (पश्चिम), ३) नया नगर व शांतीनगर जंक्शन, बी.ई.एस.टी. बस स्टॉप जवळ, मिरारोड (पूर्व) व ४) उत्तन नाका येथे परिवहन चौक्या असून तेथून परिवहन उपक्रमाच्या मार्गस्थ असणाऱ्या बसेसचे वाहतुक नियंत्रण केले जाते. सदर चौक्यांपैकी भाईंदर (पूर्व) येथील चौकी अत्यंत नादुरुस्त अवस्थेत असल्याने कोणत्याही क्षणी कोसळून कार्यरत कर्मचारी यांना दुखापत होण्याची शक्यता असून उपक्रमाच्या दस्तऐवजांना सुरक्षितता नसल्याने तेथे नव्याने परिवहन चौकी उभारणे गरजेचे आहे. तसेच मे. आर. के. इलेक्ट्रीक चौक्यांवरील लाईटच्या कामाचे देयक अद्याप अदा करणे बाकी आहे. त्याकरीता परिवहन उपक्रमाच्या सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पात **"बस थांबे, प्रवर्तक चौकी देखभाल दुरुस्ती"** या लेखाशिर्षाखाली पुरेशी शिल्लक उपलब्ध नाही.

परिवहन उपक्रमाच्या सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पात **"संगणक खरेदी, संगणक प्रणाली"** या लेखाशिर्षाखाली **"संगणक खरेदी, संगणक प्रणाली"** च्या कामाकरीता रु. १०,००,०००/- इतक्या रक्कमेची तरतुद शिल्लक आहे व नजीकच्या काळात या लेखाशिर्षाखाली शिल्लक तरतूद खर्च पडणेची शक्यता नाही.

सबब उक्त कामांकरीता परिवहन उपक्रमाच्या सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पातील **"संगणक खरेदी, संगणक प्रणाली"** या लेखाशिर्षाखाली शिल्लक रक्कम रु. १०,००,०००/- च्या तरतुदीमधून रु. ७,००,०००/- इतकी रक्कम **"बस थांबे, प्रवर्तक चौकी देखभाल दुरुस्ती"** या लेखाशिर्षात वर्ग करणेस व कामाची गरज पहाता परिवहन उपक्रमाने मा. आयुक्त सो., यांनी मान्यता दिल्याप्रमाणे भाईंदर (पूर्व) नवघर रोड लगत, बंदरवाडी येथील परिवहन चौकी मजूर सोसायटी मार्फत खरेदी करुन त्याचे देयक अदा करणेस मा. स्थायी समितीची ही सभा मंजूरी देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

मेरा अनुमोदन है।

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, ठिक आहे, ठराव झालेला आहे. संगणक खरेदी आणि संगणक प्रणाली या शिर्षकाखाली आपले टोटल प्रोव्हीजन किती होते?

**संजय तायशेटे :-**

दहा लाख रूपये.

**अनिल सावंत :-**

मग त्याचे अजुनपर्यंत खर्च किती केले?

**संजय तायशेटे :-**

अजुन खर्च झाले नाहीत.

**अनिल सावंत :-**

का केले नाहीत?

**संजय तायशेटे :-**

तशा कामाची आवश्यकता नव्हती. त्यामुळे खर्च करता आला नाही.

**अनिल सावंत :-**

मग प्रोव्हीजन का केले होते? तिथे परिवहनचा बजेट फुगवून इकडे महापालिकेकडून तुम्ही पैसे मागता. मग याची जर गरज नव्हती तर त्यावेळी १० लाखाचे प्रोव्हीजन का केले होते? कारण परिवहनचे जेवढे डेफिसिट येते, महापालिका पैसे देते. गेल्यावर्षी अडीच करोड दिले.

**दादासाहेब पाटील :-**

सन्मा. सभापती महोदय, सन्मा. सदस्य, आपण जी दहा लाखाची तरतुद केलेली होती, ती आपण जे नवी मुंबईचे सॉफ्टवेअर घेणार होतो आणि त्याचे पैसे आम्ही दिलेले नाहीत आणि ते सॉफ्टवेअर घेतले नाही.

**अनिल सावंत :-**

सॉफ्टवेअर घेतलेले आहे. विचारा.

**दादासाहेब पाटील :-**

घेतले पण त्याचे जे पैसे होते ते जास्त होते. तो १२-१५ लाख मागणार होता. आपण ५-६ लाखात घेतले अस मला वाटते.

**अनिल सावंत :-**

म्हणजे सहा लाख रूपयात घेतला आहे?

**दादासाहेब पाटील :-**

आपण तो भार कमी केला.

**अनिल सावंत :-**

पण घेतला आहे?

**दादासाहेब पाटील :-**

होय घेतलेला आहे.

**अनिल सावंत :-**

पण ते सॉफ्टवेअर चालू आहे का? जरा विचारा.

**संजय तायशेटे :-**

चालू आहे.

**जुबेर इनामदार :-**

तो सॉफ्टवेअर कसला आहे?

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, हसण्याची गोष्ट नाही. काल सी.एफ.सी. इन्चार्जना बोलवले होते. त्यांच्याजवळ परिवहन समितीच्या कम्प्युटरायझेशनचा चार्ज दिला होता. १०० टक्के नादुरूस्त आहे. तिकडे सॉफ्टवेअरचा काही उपयोग होत नाही.

**संजय तायशेटे :-**

जो सॉफ्टवेअर प्रोग्राम केलेला त्याच्यात थोडी दुरूस्ती आहे. दुरूस्ती करण्यासाठी संगणक विभागाकडे मा. आयुक्तांच्या परवानगीने प्रस्ताव पाठवलेला आहे.

**अनिल सावंत :-**

काल त्या श्रीम. सिमा मिश्रा सांगत होत्या की, जो पुर्ण प्रोजेक्ट आहे, सॉफ्टवेअर, तिथे सॉफ्टवेअर ऑपरेट करायलाच यांच्या जवळ माणसे नाहीत.

**संजय तायशेटे :-**

सॉफ्टवेअर ऑपरेट चालू आहे. कम्प्युटरमध्ये परिवहनची कामे चालू आहेत.

**अनिल सावंत :-**

मग जे सहा लाख रूपये दिले ते सॉफ्टवेअर आपण १०० टक्के युज करतो का?

**संजय तायशेटे :-**

होय.

**जुबेर इनामदार :-**

ते सॉफ्टवेअर कसले आहे? त्या सॉफ्टवेअर मधून काय निष्पन्न होते?

**अनिल सावंत :-**

हे बसथांबे प्रवर्तक चौकी, देखभाल दुरूस्ती या शिर्षकाखाली आपले किती प्रोव्हीजन होते?

**संजय तायशेटे :-**

तीन लाख रूपये.

**अनिल सावंत :-**

आणि खर्च किती झाले?

**संजय तायशेटे :-**

दोन लाख नव्व्याण्णव हजार.

**अनिल सावंत :-**

ते कशावर खर्च केले? चौक्यांवर खर्च केले की, बसथांब्यांवर खर्च केले?

**संजय तायशेटे :-**

चौक्यांवर केलेले आहेत.

**अनिल सावंत :-**

हे जे परिवहन समितीचे बसथांबे आहेत, ते बी.ओ.टी. दिलेले आहेत हे खरे आहे का?

**संजय तायशेटे :-**

होय.

**अनिल सावंत :-**

कारण त्याचे जाहिरातीचे राईट्स त्याला दिलेले आहेत. मग या चौक्या आपण तशा बी.ओ.टी. वर का देत नाही?

**संजय तायशेटे :-**

चौक्या बी.ओ.टी. वर कशा देणार?

**अनिल सावंत :-**

जर घेणारे असतील. चौक्या बांधून त्या ठिकाणी ॲडव्हर्टाईजमेंट करणारे असतील तर असे बीओटी चे प्रस्ताव मागवा.

**संजय तायशेट्ये :-**

ठिक आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण हा प्रस्ताव मंजुर करू या आणि या शक्यतेचापण विचार करू या.

**अनिल सावंत :-**

हे सात लाख रूपये खर्च करण्यापूर्वी जर बीओटी वर कोण चौक्या बांधून देणार असेल आणि तुम्ही ॲडव्हर्टाइजमेंटचे राईटस् देणार असाल, तर ते प्रस्ताव मागवून घ्या.

**संजय तायशेट्ये :-**

चालेल.

**मा. सभापती :-**

साहेब, या प्रस्तावाचा आपण विचार करा. म्हणजे चौकीच्या बाबतीत आपण जे आत्ता बसथांबे बांधले, महानगरपालिकेचा कुठेतरी फायदा होईल. प्रकरण क्र. १३५, दुरूस्तीसह सर्वांनुमते मंजुर. पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. १३५ :-**

पुर्नविनियोजनेस मंजुरी देणेबाबत. (परिवहन विभाग)

**ठराव क्र. १०७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमात १) बंदरवाडी मनपा शाळेसमोर, नवघर रोड, भाईंदर (पूर्व), २) एस.टी. स्टॅन्ड जवळ, भाईंदर (पश्चिम), ३) नया नगर व शांतीनगर जंक्शन, बी.ई.एस.टी. बस स्टॉप जवळ, मिरारोड (पूर्व) व ४) उत्तन नाका येथे परिवहन चौक्या असून तेथून परिवहन उपक्रमाच्या मार्गस्थ असणाऱ्या बसेसचे वाहतुक नियंत्रण केले जाते. सदर चौक्यांपैकी भाईंदर (पूर्व) येथील चौकी अत्यंत नादुरुस्त अवस्थेत असल्याने कोणत्याही क्षणी कोसळून कार्यरत कर्मचारी यांना दुखापत होण्याची शक्यता असून उपक्रमाच्या दस्तऐवजांना सुरक्षितता नसल्याने तेथे नव्याने परिवहन चौकी उभारणे गरजेचे आहे. तसेच मे. आर. के. इलेक्ट्रीक चौक्यांवरील लाईटच्या कामाचे देयक अद्याप अदा करणे बाकी आहे. त्याकरीता परिवहन उपक्रमाच्या सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पात **"बस थांबे, प्रवर्तक चौकी देखभाल दुरुस्ती"** या लेखाशिर्षाखाली पुरेशी शिल्लक उपलब्ध नाही.

परिवहन उपक्रमाच्या सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पात **"संगणक खरेदी, संगणक प्रणाली"** या लेखाशिर्षाखाली **"संगणक खरेदी, संगणक प्रणाली"** च्या कामाकरीता रु. १०,००,०००/- इतक्या रक्कमेची तरतुद शिल्लक आहे व नजीकच्या काळात या लेखाशिर्षाखाली शिल्लक तरतूद खर्च पडणेची शक्यता नाही.

सबब उक्त कामांकरीता परिवहन उपक्रमाच्या सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पातील **"संगणक खरेदी, संगणक प्रणाली"** या लेखाशिर्षाखाली शिल्लक रक्कम रु. १०,००,०००/- च्या तरतुदीमधून रु. ७,००,०००/- इतकी रक्कम **"बस थांबे, प्रवर्तक चौकी देखभाल दुरुस्ती"** या लेखाशिर्षात वर्ग करणेस व कामाची गरज पहाता परिवहन उपक्रमाने मा. आयुक्त सो., यांनी मान्यता दिल्याप्रमाणे भाईंदर (पूर्व) नवघर रोड लगत, बंदरवाडी येथील परिवहन चौकी मजूर सोसायटी मार्फत खरेदी करुन त्याचे देयक अदा करणेस मा. स्थायी समितीची ही सभा मंजूरी देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३६, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विहिरी सार्वजनिक वापराकरिता आवश्यक सुविधा पुरविणेबाबत खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**हेलन गोविंद :-**

प्रकरण क्र. १३६, गोषवाऱ्यानुसार सदर अंदाजपत्रकिया खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

मेरा अनुमोदन है।

**निर्मला सावळे :-**

मा. सभापती महोदय, गोषवाऱ्यामध्ये असे दिलेले आहे की, २८ विहिरांना पंप बसवून टाकीव्दारे पाणी दैनंदिन वापरासाठी उपलब्ध करून देणे. म्हणजे ते आपले काय प्रोव्हीजन आहे. टाकीमध्ये म्हणजे आपल्या सध्या ज्या टाक्या आहेत, त्याच्यामध्ये पाणी ट्रान्सफर करणार का?

**शिवाजी बारकुंड :-**

याचे असे प्रोव्हीजन आहे, विहिरीचे पाणी हे पिण्यासाठी नाही. थोडी पाण्याची टंचाई असल्यामुळे, आपण तिकडे सिंटेक्सची टाकी बसवणार, पंप बसवणार, पंप लावणार आणि तिथे कपडे धुण्यासाठी किंवा पिण्यासाठी रिक्त अन्य वापरासाठी हे पाणी वापरणार. अशा २८ ठिकाणी आपण व्यवस्था करणार.

**बर्नट डिमेलो :-**

मा. सभापतीसाहेब, २८ ठिकाणे कोणकोणती आहेत?

**शिवाजी बारकुंड :-**

विहिरी आहेत. त्यांचा सध्या वापर होतो. लोक वापर करतात. त्या ठिकाणीच आपण केलेले आहे.

**बर्नट डिमेलो :-**

मग टाक्या कशा आणि कुठे राहतील?

**शिवाजी बारकुंड :-**

विहिरीच्या बाजूलाच सिंटेक्स टाकी करायची. तिथे पंप बसवायचा. पंपाने टाकीमध्ये पाणी चढवायचे आणि धुणीघाट वगैरे कसा असतो, चारपाच नळ बाहेर काढायचे. लोक तिकडे कपडे धुतील किंवा अन्य कारणासाठी पाणी वापरतील.

**जुबेर इनामदार :-**

पिण्याकरिता पाणी वापरता येईल का?

**शिवाजी बारकुंड :-**

आपण ते रिपोर्ट मागवले. त्या विहिरींचे पाणी पिण्यासाठी अयोग्य आहे. पिण्याव्यतिरिक्त अन्य कारणासाठी आपण हे पाणी वापरू शकतो.

**जुबेर इनामदार :-**

माझी अशी सुचना आहे की, त्या टाकीवर तुम्ही तसे लिहा की, पाणी पिण्याकरीता योग्य नाही. दोन तीन भाषेमध्ये करा.

**प्रविण पाटील :-**

मा. सभापती साहेब, हा विषय असा आहे, आपण आत्ता ५० लाखाची प्रोव्हीजन करतो आहे. ही नेमकी कशासाठी करतो?

**मा. सभापती :-**

सध्या आपल्या शहरामध्ये जी पाण्याची अडचण भासते. पाण्याचे शॉर्टेड आहे. या वेळेला पाऊस कमी पडला आहे. तलावामध्ये पाणी जिथून आपण घेतो तिकडून आपल्याला व्यवस्थित पाणी देत नाहीत. इतके दिवस आपला शट डाऊन आहे. आत्ता आपल्या शहरामध्ये जुन्या विहिरी होत्या. त्या पाणी येत असल्यामुळे बंद होत्या.

**प्रविण पाटील :-**

आपण याची मुदत दिलेली नाही की, कधीपासून करणार आहोत. आपण दुष्काळ पडल्यानंतर करणार आहोत. पण दुष्काळ कधी पडणार हे आपल्याला माहिती नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

पाण्याची टंचाई आपल्याला आत्ताच आहे. आज आर्थिक मंजुरी झाली की, आपण इमिजीएट युध्दपातळीवर काम सुरू करणार. आणि हे करणे आवश्यक आहे. जेणेकरून पिण्याच्या पाण्याचा वापर कमी होईल. या लोकांना धुण्यासाठी, गार्डनींगसाठी किंवा अन्य कामासाठी पाणी वापरले जाईल. हा प्रस्ताव तातडीने करणे गरजेचे आहे.

**बर्नट डिमेलो :-**

युध्दपातळीवर म्हणजे पावसाळ्या अगोदर होईल का?

**शिवाजी बारकुंड :-**

१५ ते २० दिवसांच्या आत ही सगळी कार्यवाही होऊन जाईल.

**प्रविण पाटील :-**

याची आपण काही मुदत ठेवली आहे की, कधीपर्यंत करणार आहोत? दुसरे असे की, काही विहिरी खाजगी जागेमध्ये आहेत. त्यांच्या घरामध्ये, वाड्यामध्ये आहेत.

**शिवाजी बारकुंड :-**

खाजगी जागेतील विहीरींचे याच्यामध्ये नाही. आपल्या महापालिकेच्या सार्वजनिक विहीरी आहेत. त्याच विहिरीवरचे आपण प्रस्ताव केलेले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

त्यातून रोज किती लिटर पाणी उपलब्ध होईल?

**शिवाजी बारकुंड :-**

बऱ्याचशा चांगल्या विहिरी आहेत. चांगले पाणी मिळेल. दहा ते वीस हजार असे प्रत्येक ठिकाणी आपल्याला मिळेल. त्यातून एक साध्य होईल की, पिण्याच्या पाण्यावर जो ताण येतो तो थोडा कमी होईल.

**बर्नट डिमेलो :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो. आत्ता आपण जी २८ संख्या बोललेले आहात. आमच्या उत्तनचा जर विषय घेतला तर चार प्रभागांमध्ये मला तरी वाटते की, ६०-७० विहीरी आणि तलाव आहेत. तर नेमके कुठे आणि कसले? कोणत्या प्रभागाल किती द्यायचे किंवा टाक्या टाकायच्या?

**शिवाजी बारकुंड :-**

आपण त्याची लिस्ट काढलेली. काम चालू करण्या अगोदर संबंधित नगरसेवकांना त्याची कल्पना देऊ. ज्या ठिकाणी जास्त वापर आहे, असा ठिकाणचेच आपण प्रायोरिटी बेसवर घेतलेले आहे.

**बर्नट डिमेलो :-**

मध्यवर्ती ठिकाणे पाहिजेत.

**शिवाजी बारकुंड :-**

अशा ठिकाणच्याच विहिरी जास्त घेतलेल्या आहेत.

**दिपक खांबीत :-**

तुमच्या गावातील तुम्हाला विचारूनच घेऊ.

**मा. सभापती :-**

तिकडचे काही असेल तर तुम्ही दाखवा. आणि मी सर्वांना एक विनंती करतो, या विहिरींच्या संदर्भामध्ये आपण ठराविक विहीरींचा पाहणी दौरा करू की, काय परिस्थीती आहे आणि काय नाही. त्या विभागातील लोकांना त्याचा किती फायदा मिळेल. कारण सध्या जी परिस्थिती आहे, तर आपण ठराविक लोकांना घेऊन पाहणी दौरा करू या. आणि अशा काही विहीरी असतील. आत्ता या २८ आहेत. याच्यामध्ये जर वाढ झाली तर आपण त्याला मान्यता देऊ.

**निर्मला सावळे :-**

मा. सभापती महोदय, घोडबंदरला शंकर मंदिराजवळ पिण्याच्या वापरातील एक विहीर होती. परंतु, आजुबाजूला शौचालय जास्त झाल्यामुळे ते पूर्ण पाणी त्याच्यामध्ये उतरल्यामुळे आपण चाचणी केली. तर ते पाणी पिण्यायोग्य नाही. परंतु तीन वर्षापासून त्याचा उपसापण झाला नाही. आम्ही समाजसेवेच्या माध्यमातून दरवर्षी पावसाळ्याच्या अगोदर त्या विहिरीचा उपसा करतो आजही आपण प्रक्रिया करून जर हे शौचालय थांबवले आणि ते पाणी उपलब्ध करून दिले, कारण तिथे रेतीवाले, पडाववाले मोठ्या प्रमाणात त्यांना पाण्याचा कुठेच स्त्रोत नाही. त्यामुळे त्या विहिरीवरचे पाणी एवढे दुर्गंधी असले तरीही ते आजही पितात. त्याच्यामध्ये आपल्याला चांगल्या प्रकारे काय व्यवस्था देता येईल ते करायचे. आणि माझी दुसरी सुचना आहे, साईनाथ सेवानगर येथे जवळ जवळ १५०-२०० वर्षापूर्वीची एक जुनी विहीर आहे. मोठा प्रश्न आहे. तर ती आपल्याला दैनंदिन वापरासाठी खुली होईल. आणि मला त्याची माहिती मिळू द्या.

**अनिल सावंत :-**

याच्यामध्ये १२३ विहिरी आणि २५ तलाव म्हटले आहेत. ज्या तलावांचा आपण लिलाव केलेला आहे. ते तलावसुध्दा याच्यामध्ये आहेत का?

**दिपक खांबीत :-**

ते नाहीत.

**अनिल सावंत :-**

मग आपल्याजवळ हे जे २५ तलाव आहेत, त्यांचे याच्यापूर्वी मेन्टेनन्स केले होते? आजची परिस्थिती काय आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

आजची परिस्थिती म्हणजे, दरवर्षी आपण फक्त वरचा कचरा वगैरे काढायचो. आत्तापण कचरा काढतो आहे. काही ठिकाणी तलावांमध्ये खालूनपण चांगले पाणी येते आहे. थोडासा गाळ वगैरे काढला तर त्या पाण्याचा ग्रामीण भागात चांगला उपयोग होऊ शकतो. म्हणून आपण हे प्रायोगिक तत्वावर घेतलेले आहे.

**अनिल सावंत :-**

हे जे १२३ विहिरी आहेत, त्या सर्व आपण साफसफाई करणार आहोत?

**दिपक खांबीत :-**

फक्त २८ विहिरी.

**शिवाजी बारकुंड :-**

पंप बसवून आपण २८ विहिरी करणार आहेत. बाकीच्या विहीरींची साफसफाई आपण करत आहोत. जिथे जास्त वापर आहे, त्या २८ विहिरी आपण घेतलेल्या आहेत. अजून जास्त असतील तर आपण दुस-यापण घेऊ.

**निर्मला सावळे :-**

हे ५० लाखाचे जे अंदाजपत्रक केलेले आहे, त्याच्यामध्ये देखभाल दुरूस्तीपण आली का? कारण आपण ऑलरेडी विहीरींची देखभाल दुरूस्ती केलेली आहे.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. १३६, सर्वांच्या दुरूस्तीसह हा विषय सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे. पुढील विषय घेण्यांत यावा.

**प्रकरण क्र. १३६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विहिरी सार्वजनिक वापराकरिता आवश्यक सुविधा पुरविणेबाबत खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. १०८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील गेल्या पावसाळ्यामध्ये मुंबई व उपनगरांना पाणीपुरवठा करणा-या तलाव क्षेत्रात सरासरीपेक्षा सुमारे ३० टक्के पर्जन्यवृष्टी कमी झालेली आहे. परिणामी येणा-या एप्रिल मे महिन्यात कोरडा दुष्काळ पडण्याची दाट शक्यता असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे त्याचे हद्दीतील सार्वजनिक वापराच्या विहिरी तसेच तलाव यांचेमधील गाळ साफ करणेबाबत युध्दपातळीवर कार्यवाही करणेचे संबंधितांना निर्देश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक वापराच्या सर्व विहिरीतील गाळ काढून साफ करणेकामी पाणी पुरवठा विभागाकडे नोंद असलेल्या विहिरीच्या यादीप्रमाणे विहिरीचे सर्वेक्षण केले असता एकूण १२३ विहिरीतील तसेच २५ तलावातील गाळ काढूण साफ करणे अनिवार्य आहे. परंतु, सद्यस्थितीत आज जर विहिरीतील तसेच तलावातील पाणी उपसून गाळ काढला तर सदरील रिक्त झालेल्या विहिरी / तलाव पावसाळ्यात साधारणतः जुलै ते ऑगस्ट महिन्यापर्यंत पाण्याने भरते तोपर्यंत सदरील विहिरी / तलाव कोरडेच राहणार असल्याने आज आहे ते पाणीसुध्दा वापरण्यास मिळणार नाही.

सबब वरील बाबींचे गांभीर्य लक्षात घेऊन सद्यस्थितीत सार्वजनिक वापर असलेल्या विहीरींना विद्युत पंप बसवून विहिरी लगत सिंटेक्सची पाण्याची टाकी उंचावर बसवून त्यामध्ये पंपाद्वारे पाणी चढवून सदरील पाणी वापरण्यास दिल्यास पिण्याच्या पाण्याचा इतर कामासाठी कमी वापर होऊ शकेल.

वरील कामी महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक वापराच्या विहिरींचे सर्वेक्षण केले असता एकूण २८ विहरींना पंप बसवून टाकीद्वारे पाणी दैनंदिन वापरासाठी उपलब्ध करुन देता येउ शकते. सदर कामी सुमारे रु. ५०,००,०००/- एवढ्या रक्कमेचे अंदाजपत्रक होत असून सन २००९-१० या आर्थिक वर्षाच्या तळी / विहिरी उपसून गाळ काढणे या लेखाशिर्षाखाली रु. ५०,००,०००/- एवढी तरतुद करण्यात आलेली आहे. सदर कामाची निकड लक्षात घेता सदर कामाची निविदा मागविण्यात आलेली आहे. तरी सदर अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. हेलन गोविंद अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३७, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रेल्वे प्रशासन संबंधित विविध विकास कामे करणे कामी तांत्रिक सल्लागार नेमणूकीबाबत.

**दिपक खांबीत :-**

हा विषय असा आहे की, ही जी राईट कंपनी आहे, रेल्वेच्या कामाला जो तांत्रिक सल्लागार नेमावा लागतो तो रेल्वेचाच लागते. तो बाहेरचा नेमता येत नाही. याच्यामध्ये आपण मे. राईट यांना २००५ मध्ये नेमले होते. आणि त्यांच्याकडे आपण जेसल पार्क सबवे आणि कल्वर्टची कामे दिली होती. त्याच्यामध्ये जे प्रिटेंडरींगचे काम असते म्हणजे एस्टीमेट करणे, ड्रॉईंग बनवणे आणि रेल्वेचे अप्रुव्हल घेणे हे काम त्यांनी केलेले आहे. आपले कल्वर्टचे काम आपण त्या दिवशी मंजुर केले. पण त्याचे पोस्ट टेंडर नसल्यामुळे आपले ते काम रखडले आहे. म्हणजे आपण रेल्वेला अजूनपर्यंत ड्राईंग सबमिट केले नाही. त्याकरिता जसा आपल्याला बिल्डींग प्रपोझनला आर्किटेक्ट लागतो, तसा रेल्वेच्या कामांना त्यांचाच कन्स्लटंट लागतो. त्याकरिता आपल्याला त्यांना नेमायचे आहे. तर जी फर्स्ट फेज होती त्याचे आपण जवळ जवळ ३० लाख रूपयांचे पेमेंन्ट केलेले आहे. आणि हे कल्वर्टचे काम आहे ते आपल्याला पहिल्या फेजमध्ये ती महिन्यांकरिता लागेल. आपण हे दोन जे कल्वर्ट करतो, ह्याकरिता त्याला तीन महिन्यांकरिता नेमावे लागेल. आणि जेव्हा जेसल पार्कचा सबवे येईल तेव्हा त्याचे वेगळे रेट देऊन, ते पुन्हा आम्ही मंजुरीला तुमच्यासमोर आणू.

**मदन उदितनारायण सिंग :-**

साहेब, जेसल पार्क सब वे चे काम कुठपर्यंत आले आहे? त्यामध्ये काय बाकी आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

कल्वर्टसाठी कन्सल्टंट नेमणे हा विषय संपू द्या. मग मी तुम्हाला माहिती देतो.

**मदन उदितनारायण सिंग :-**

पण या विषयाच्या हेडींगमध्ये जैसलपार्क सबवेपण लिहिला आहे ना?

**शिवाजी बारकुंड :-**

आजच्या घडीला पावसापूर्वी जे दोन कल्वर्ट रेल्वेच्या खाली करायचे आहेत, त्याला रेल्वेचीच कन्स्लटन्सी लागते. हा विषय मंजूर करा. तुम्हाला सबवेची माहिती देतो.

**मदन उदितनारायण सिंग :-**

पण साहेब, या गोषवार्यामध्ये जेसलपार्क सबवेपण दिला आहे म्हणून विचारतो आहे.

**दिपक खांबीत :-**

साहेब, मा. महासभेने मंजुरी दिल्याप्रमाणे जे एस्टीमेट आहे, ते करायला या कंपनीला दिलेले आहे. त्यांच्याकडून मंजुरी झाल्या नंतर पुन्हा हा विषय येईल.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मग ते कधीपर्यंत मंजुर होईल? म्हणजे मंजुरीला अजून कुठे अडचण आहे.

**दिपक खांबीत :-**

आपण रेल्वेलाच दिले आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

कधी पर्यंत येईल?

**दिपक खांबीत :-**

एक महिना लागेल.

**मदन उदितनारायण सिंग :-**

ह्या सल्लागारांनी सांगितले की, एक महिन्यात देईन?

**दिपक खांबीत :-**

होय.

**मदन उदितनारायण सिंग :-**

बोलणे झाले आहे का? आत्ता आज जो विषय आला आहे तो फक्त कल्वर्टसाठी आहे. जेसलपार्क सबवेचे याच्यात काही नाही? पण हे सुपरव्हिजन आपल्याला किती महिन्यांसाठी ठेवायचे आहे? म्हणजे आपण मंजुरी दिली. समजा काम सुरू व्हायला सहा महिने लागतील, तरी त्याचे पेमेंट चालू होईल की, काम चालू झाल्यानंतरच चालू होईल?

**दिपक खांबीत :-**

काम चालू झाल्यानंतर.

**निर्मला सावळे :-**

मा. सभापती महोदय, त्याला काही बंधन असेल ना की, तीन महिन्यात आमचे हे काम पूर्ण झाले पाहिजे. मग वाढल्यानंतर काही प्रोसीजर ठेवली आहे का?

**मदन उदितनारायण सिंग :-**

तीन महिन्यात काम पूर्ण होईल का?

**शिवाजी बारकुंड :-**

रेल्वेगाड्या चालू असताना अंडरग्राऊन्ड काम करायचे आहे. अपेक्षित त्यांच्याशी चर्चा केली रेल्वेशीही चर्चा केली. साधारणतः तीन ते चार महिने लागतील असे अपेक्षित आहे. आपल्याकडे हे अशाप्रकारचे पहिलेच काम आहे. आपण तीन-चार महिने गृहित धरू लागले तर परत स्टॅंडीगपुढे येऊ. त्याच्यामध्ये काही अडचण नाही.

**दिपक खांबीत :-**

साहेब, हे जे कल्वर्ट आहेत. त्यातील आपला पहिला कल्वर्ट फाटका जवळचा, हा तीन महिन्यात पूर्ण होईल. त्यानंतर जेव्हा दुसरा होईल तेव्हा त्यालापण तीन महिने लागतील. मग ते बहुतेक पावसाळ्यानंतर घेतील असे वाटते.

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पूर्व) जेसलपार्क येथे सब-वे बांधणे व भाईंदर ते मिरारोड स्टेशन दरम्यान रेल्वे खालील कल्वर्ट बांधणे इ. कामी मे. राईट्स लि. या रेल्वे अंगीकृत एजन्सीची रेल्वे प्रशासनाच्या शिफारशीनुसार तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक केलेली आहे. सदर कामी मे. राईट्स लि. व मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्यामध्ये दि. २५/०७/२००५ रोजी करारनामा करण्यात आलेला असून सदर करारनाम्यात कामाची मुदत ३६ महिने आहे. सदर करारनाम्यात कामाचा Scope of work व कामाचे दर निश्चित केलेले आहे. सदर करारनाम्याची मुदत संपलेली असून नव्याने करारनामा करावयाचा आहे.

मे. राईट्स लि. यांनी एम.यू.एम./पी.आर./एम.बी.एम.सी./०७६/भाईंदर/०२, दि. ०४/०२/२०१० च्या पत्रान्वये Modified / Revised Draft Agreement सादर केलेला आहे. सदर करारनाम्यात Pre-Tendering Stage व Post Tendering Stage याप्रमाणे तपशिल नमुद केलेला आहे. भाईंदर (पूर्व) व (प.) स्टेशन दरम्यान Micro Tunneling Method द्वारे कल्वर्ट बांधणे कामी Supervision Charges (Post Tendering Stage) करारनाम्यातील पान क्र. ७ वरील सुधारीत दराचा प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर केलेला आहे.

१) भाईंदर व मिरारोड स्टेशन दरम्यान कल्वर्ट बांधणे

Supervision Charges - रु. ७.५० लक्ष प्रति महिना + सर्व्हिस टॅक्स

२) सदर कामाकरीता प्रत्येक तिमाही आगाऊ फी देणे तसेच प्रत्येक तीन महिन्यात टप्प्यांचा कालावधी संपण्यापूर्वी फी देणे याबाबत कळविले आहे.

तसेच मे राईट लि. यांनी भाईंदर (पूर्व) व (प.) जैसल पार्क येथील सबवे बांधणे कामाकरीता यानंतर दर प्रस्ताव देउन स्वतंत्र करारनामा करण्यात येईल असे नमुद केलेले आहे. सद्यस्थितीत भाईंदर (पूर्व) जैसल पार्क येथे सबवे बांधणे कामी Micro Tunneling Method द्वारे निविदा प्राप्त झालेली असून मे. राईट्स यांचे अभिप्राय मागविण्यात आलेले आहे. तसेच भाईंदर ते मिरारोड स्टेशन दरम्यान रेल्वेखालील कल्वर्ट बांधणे कामाचे कार्यादेश ठकेदारास देण्यात आले असून प्रत्यक्षात लवकरच कामास सुरुवात करावयाची आहे. सदर रेल्वे खालील कल्वर्ट व सबवे कामाची निकड लक्षात घेता प्रशासनाने यापूर्वीच नेमलेल्या मे. राईट्स या संस्थेच्या पूर्वी मंजूर केलेल्या दरांना प्रस्तावित दराना तसेच वेळोवेळी मागणी करण्यात येणाऱ्या दरानुसार करारनामा करुन देयके प्रदान करण्यास ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने सदर संस्थेसोबत करारनामा करुन पुढील प्रशासकीय कार्यवाही करावी. ठराव गोषवाऱ्याप्रमाणे वाचून त्याला मंजुरी देत आहे, असा मी ठराव मांडतो.

**मा. सभापती :-**

विषय सर्वानुमते मंजुर. सचिव साहेब पुढील विषय घेण्यांत यावा.

**प्रकरण क्र. १३७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रेल्वे प्रशासन संबंधित विविध विकास कामे करणे कामी तांत्रिक सल्लागार नेमणूकीबाबत.

**ठराव क्र. १०९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पूर्व) जेसलपार्क येथे सब-वे बांधणे व भाईंदर ते मिरारोड स्टेशन दरम्यान रेल्वे खालील कल्वर्ट बांधणे इ. कामी मे. राईट्स लि. या रेल्वे अंगीकृत एजन्सीची रेल्वे प्रशासनाच्या शिफारशीनुसार तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक केलेली आहे. सदर कामी मे. राईट्स लि. व मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्यामध्ये दि. २५/०७/२००५ रोजी करारनामा करण्यात आलेला असून सदर करारनाम्यात कामाची मुदत ३६ महिने आहे. सदर करारनाम्यात कामाचा Scope of work व कामाचे दर निश्चित केलेले आहे. सदर करारनाम्याची मुदत संपलेली असून नव्याने करारनामा करावयाचा आहे.

मे. राईट्स लि. यांनी एम.यू.एम./पी.आर./एम.बी.एम.सी./०७६/भाईंदर/०२, दि. ०४/०२/२०१० च्या पत्रान्वये Modified / Revised Draft Agreement सादर केलेला आहे. सदर करारनाम्यात Pre-Tendering Stage व Post Tendering Stage याप्रमाणे तपशिल नमुद केलेला आहे. भाईंदर (पूर्व) व (प.) स्टेशन दरम्यान Micro Tunneling Method द्वारे कल्वर्ट बांधणे कामी Supervision Charges (Post Tendering Stage) करारनाम्यातील पान क्र. ७ वरील सुधारीत दराचा प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर केलेला आहे.

१) भाईंदर व मिरारोड स्टेशन दरम्यान कल्वर्ट बांधणे

Supervision Charges - रु. ७.५० लक्ष प्रति महिना + सर्व्हिस टॅक्स

२) सदर कामाकरीता प्रत्येक तिमाही आगाऊ फी देणे तसेच प्रत्येक तीन महिन्यात टप्प्यांचा कालावधी संपण्यापूर्वी फी देणे याबाबत कळविले आहे.

तसेच मे राईट लि. यांनी भाईंदर (पूर्व) व (प.) जैसल पार्क येथील सबवे बांधणे कामाकरीता यानंतर दर प्रस्ताव देउन स्वतंत्र करारनामा करण्यात येईल असे नमुद केलेले आहे. सद्यस्थितीत भाईंदर (पूर्व) जैसल पार्क येथे सबवे बांधणे कामी Micro Tunneling Method द्वारे निविदा प्राप्त झालेली असून मे. राईट्स यांचे अभिप्राय मागविण्यात आलेले आहे. तसेच भाईंदर ते मिरारोड स्टेशन दरम्यान रेल्वेखालील कल्वर्ट बांधणे कामाचे कार्यादेश ठकेदारास देण्यात आले असून प्रत्यक्षात लवकरच कामास सुरुवात करावयाची आहे. सदर रेल्वे खालील कल्वर्ट व सबवे कामाची निकड लक्षात घेता प्रशासनाने यापूर्वीच नेमलेल्या मे. राईट्स या संस्थेच्या पूर्वी मंजूर केलेल्या दरांना प्रस्तावित दराना तसेच वेळोवेळी मागणी करण्यात येणाऱ्या दरानुसार करारनामा करुन देयके प्रदान करण्यास ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने सदर संस्थेसोबत करारनामा करुन पुढील प्रशासकीय कार्यवाही करावी.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३८, निविदांना मंजुरी देणे. (आरोग्य साफसफाई विभाग)

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. सभापती साहब, आप यह आरोग्य का विषय लाए है। अपने शहर मे चार महिने से ज्यादा हुआ है, पुरे शहर मे बिमारी फैल रही है, बदबू फैल रही है, कोई काम नही हो रहा है, रोज हर पार्टी का मोर्चा आ रहा है। तो इस विषय का मतलब क्या? और हमने पेमेंट क्यों देने का?

**मा. सभापती :-**

यह ठराव मंजुर होने दिजीए, फिर चर्चा करते है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

ठराव हो गया तो फिर क्या चर्चा? श्री. म्हात्रे साहेब, मिरा रोड मे कचरे का तकलीफ नही है क्या?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

है ना।

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो फीर पहले वो चर्चा किजीए।

(सभागृहात गोंधळ )

**मा. सभापती :-**

एक एकाने बोला.

**बर्नट डिमेलो :-**

ठराव मांडल्यानंतर तुम्ही चर्चा करा.

**मदन उदितनारायण सिंह :-**

ठराव मांडायला किती वेळ लागतो. ठराव एका मिनिटात होतो.

**मदन उदितनारायण सिंग :-**

श्री. बारकुंड साहब, आप किस बात का इंतजार कर रहे है। जैसे पानी का आंदोलन हुआ पुरा शहर जला, उसका आप इंतजार कर रहे है क्या?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन नियम २००० अन्वये २४ गटाकरीता दैनंदिन साफसफाई, कचरा गोळा करणे इत्यादी साफसफाई विषयक कामाचे तसेच वर्षातुन दोन वेळा नाले सफाई करणे कामाचे निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरबाबत प्रशासनाने दिलेल्या गोषवा-याचा विचार करता खालीलप्रमाणे मान्यता देत आहे.

| गट क्र. | प्रभाग क्र | निविदाकाराचे नाव | वॉर्ड साफसफाई कामी मंजुर दर | नालेसफ़ाई कामी मंजुर दर |
|---|---|---|---|---|
| १ | १, २५, २६ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन कंपनी | रु. ६५,००,०००/- | रु. ३,००,०००/- |
| २ | २, २३, २४ | मे. संकल्प ट्रेडिंग कंपनी | रु. ७२,११,६५८/- | रु. ३,६०,०००/- |
| ३ | २०,२१, २२, ३७, ३९ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन कंपनी | रु. १,०३,२९,९३२/- | रु. ८,४०,०००/- |
| ४ | ३३, ३४, ३५, ३६, ३८ | मे. श्री साईगणेश कंन्ट्रक्शन कंपनी | रु. १,२४,०२,१३७/- | रु. ४,८०,०००/- |
| ५ | २७, २८, २९ | मे. राज कंन्ट्रक्शन कंपनी | रु. १,०८,११,६८७/- | रु. ३,६०,०००/- |
| ६ | ३०, ३१, ३२ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन कंपनी | रु. ९८,९४,४०२/- | रु. ३,६०,०००/- |
| ७ | १९, ४०, ४१, ४२ | मे. श्री साईगणेश कंन्ट्रक्शन कंपनी | रु. ९०,८५,०८४/- | रु. ८,४०,०००/- |
| ८ | १२, १३, १४ | मे. गणेश डेव्हलपर्स | रु. ६२,४३,७५७/- | रु. ३,५०,०००/- |
| ९ | ४७, ४८, ४९ | मे. आशापुरा कंन्ट्रक्शन कंपनी | रु. ८६,७२,९३८/- | रु. ५,५०,०००/- |
| १० | ३, ४, ५, ६ | मे. संकल्प ट्रेडिंग कंपनी | रु. १,०२,१४,८४६/- | रु. ३,००,०००/- |
| ११ | ४५, ४६ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन कंपनी | रु. ३७,०६,५०४/- | रु. ६,००,०००/- |
| १२ | ७, ८, ९, १०, ११ | मे. श्री साईगणेश कंन्ट्रक्शन कंपनी | रु. ९१,४५,६१५/- | रु. ६,००,०००/- |
| १३ | १५, १६, १७, १८ | मे. श्री साईगणेश कंन्ट्रक्शन कंपनी | रु. १,०५,३१,८१४/- | रु. ७,००,०००/- |
| १४ | ५०, ५२, ५३, ५४, ५५ | मे. राज कंन्ट्रक्शन कंपनी | रु. १,१४,७४,७८९/- | रु. ३,६०,०००/- |
| १५ | ५६, ५७, ५८, ५९ | मे. गुरुजी कंन्ट्रक्शन कंपनी | रु. ८६,९२,९४२/- | रु. ८,००,०००/- |
| १६ | ६०, ६३, ६४, ६५ | मे. आशापूरा कन्ट्रक्शन कपंनी | रु. ९०,३६,००१/- | रु. ६,००,०००/- |
| १७ | ६६, ६७, ६८ | मे. गुरुजी कंन्ट्रक्शन कंपनी | रु. ५४,११,१८२/- | रु. १८,००,०००/- |
| १८ | ६२, ६९, ७१ | मे. राजश्री इंन्टरप्रायझेस | रु. ६०,१८,२१२/- | रु. ६,००,०००/- |
| १९ | ७४, ७५, ७६, ७७ | मे. जय श्रीकृष्ण ट्रान्सपोर्ट | रु. ७६,८४,८४४/- | रु. १०,००,०००/- |
| २० | ७२, ७३ | मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट | रु. ५४,८५,७९०/- | रु. १२,५०,०००/- |
| २१ | ७०, ७८, ७९ | मे. राज कंन्ट्रक्शन कंपनी | रु. ९२,९०,५०५/- | रु. १२,००,०००/- |
| २२ | ५१ | मे. गणेश अर्थ मुव्हींग कंपनी | रु. ४२,६७,७७८/- | रु. १६,११,०००/- |
| २३ | ६१ | मे. संकल्प ट्रेडिंग कंपनी | रु. ३६,५७,१९२/- | रु. २१,६०,०००/- |
| २४ | ४३, ४४ | मे. गुरुजी कंन्ट्रक्शन कंपनी | रु. ५१,५७,७१५/- | रु. ३,५०,०००/- |

वरील प्रमाणे गट निहाय प्रभाग साफसफाई व नाले सफाई करणे कामी गट क्र. ०१ ते २४ गटाकरीता आलेल्या दरास हि सभा मान्यता देत आहे.

**हेलन गोविंद :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, आत्ता ही चर्चा पुर्ण होईपर्यंत पुढील विषय घेउ नका.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब, आत्ता ठराव झाला, कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रशासनाची आजच्या तारखेत काय भुमिका आहे?

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, या विषयाला मा. आयुक्त साहेब येतील का?

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब आले असते तर बरे झाल असते.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब असतील तर चर्चा करायला बरे वाटेल.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब रहने के बाद भी, मा. आयुक्त के उपर कचरा फेककर भी, मोर्चा निकालकर भी कुछ हुआ नही। मा. आयुक्त नही रहेंगे तो चिल्लाकर क्या करेंगे?

**शिवाजी बारकुंड :-**

मा. आयुक्त साहेब येत आहेत, तोपर्यंत पुढचा विषय घ्यावा.

**मदन उदितनारायण सिंह :-**

आज कचरे पर चर्चा करके ही बाहर निकलेंगे नही तो बाहर नही निकलेंगे।

**शिवाजी बारकुंड :-**

आपलेच शिष्टमंडळ तिकडे बसलेले आहे. साहेब, आल्यावर चर्चा करतील तो पर्यंत पुढचा विषय घ्या.

**बर्नट डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, यावर मी थोडे सुचित करतो की, प्रत्येकाला फक्त दोन दोन गाड्यांचा ढीग पडला आहे तर वास सहन होत नाही आणि रोगराई पसरली असे सगळे बोंबलतात. आणि ते खरेही आहे. त्याला मी बोलत नाही की, जे सन्मा. सदस्य सांगतात ते ...

**मदन उदितनारायण सिंह :-**

म्हणजे ज्या दोन गोड्या पडल्या आहेत ते वीस गाड्या होऊ द्या.

**बर्नट डिमेलो :-**

मला एवढेच म्हणायचे आहे की, दोन कच-याची दुर्गंधी एवढी पसरते तर आमच्या गावाची काय हालत होत असेल याची तुम्ही कल्पना करा. आम्ही विरोध करत नाही. जर तुम्हाला असे घनकचरा प्रकल्प करायचे आहेत. तर मला वाटते की, जेवढे प्रभाग तेवढे घनकचरा प्रकल्प करा. ज्याच्या एरियाचा कचरा त्याच्या एरियामध्ये घ्यावा.

**मदन उदितनारायण सिंह :-**

ते सगळे बोलून झाले आहे.

**बर्नट डिमेलो :-**

तुम्ही नंतर बोला. मी सुचना मांडतो त्याच्यानंतर तुम्ही काय पर्याय काढता ते तुम्ही बोला. मला एवढेच म्हणायचे आहे की, दोन गाड्यांची दुर्गंधी जर एवढी पसरत असेल तर आमच्या परिसराचे हाल काय? म्हणून या विषयावर चर्चा होऊन लवकरात लवकर तोडगा काढावा असे मला तरी वाटते. अन्यथा असे मोर्चे आणून मा. आयुक्तांवर दबाव देऊन शासकिय दाखवून तसे केले तर मला तरी वाटते की, भविष्यामध्ये भाईंदरमध्ये मोठे माजेल.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य श्री. बर्नट डिमेलो, मी आपल्याला एक सांगतो. कमिशनर साहेब या ठिकाणी नाही. आपण हा विषय मंजुर केलेला आहे. एक घंटा, दो घंटा, तीन घंटा भी लगगो तो चलेगा। मगर कमिशनर साहब को रहने दो। हमने विषय मंजुर किया है। कमिशनर साहब आयेंग, तो इसके उपर फिर चर्चा करते है। तोपर्यंत आपण पुढील विषय घेऊ असे माझे मत आहे. सचिव साहेब, हा विषय मंजुर करण्यात आलेला आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**अनिल सावंत :-**

सन्मा. सदस्य श्री. मदन सिंहजी, वो जो विषय था वो टेंडर पास करने का था। उसे आर्थिक और प्रशासकिय मंजुरी पहले से दी हुई है। और जो पहले का ठेका था वो सप्टेंबर मे खत्म हो गया। और अब कॉन्ट्रक्टर को अगर नया ठेका नही देंगे। तो जो हालत है वो और हो जाएगी और ठेकेदार काम नही करेंगे।

**मदन उदितनारायण सिंह :-**

वैसे भी हम मंजुरी देते है। लेकिन उसके सिवा दुसरा कुछ अपने हाथ मे नही है। जिसके हाथ मे है वो कुछ करता नही है।

**मा. सभापती :-**

हम चर्चा करेंगे।

**प्रविण पाटील :-**

साहेब, मंजुरीसाठी आपला विरोध नाही.

**मा. सभापती :-**

अभी कमिशनर साहब नही है। वो आयेंगे तो उनके साथ बात करेंगे.

**प्रकरण क्र. १३८ :-**

निविदांना मंजुरी देणे. (आरोग्य साफसफाई विभाग)

**ठराव क्र. ११०  :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन नियम २००० अन्वये २४ गटाकरीता दैनंदिन साफसफाई, कचरा गोळा करणे इत्यादी साफसफाई विषयक कामाचे तसेच वर्षातुन दोन वेळा नाले सफाई करणे कामाचे निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरबाबत प्रशासनाने दिलेल्या गोषवा-याचा विचार करता खालीलप्रमाणे मान्यता देत आहे.

| गट क्र. | प्रभाग क्र | निविदाकाराचे नाव | वॉर्ड साफसफाई कामी मंजुर दर | नालेसफ़ाई कामी मंजुर दर |
|---|---|---|---|---|
| १ | १, २५, २६ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन कंपनी | रु. ६५,००,०००/- | रु. ३,००,०००/- |
| २ | २, २३, २४ | मे. संकल्प ट्रेडिंग कंपनी | रु. ७२,११,६५८/- | रु. ३,६०,०००/- |
| ३ | २०,२१, २२, ३७, ३९ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन कंपनी | रु. १,०३,२९,९३२/- | रु. ८,४०,०००/- |
| ४ | ३३, ३४, ३५, ३६, ३८ | मे. श्री साईगणेश कंन्ट्रक्शन कंपनी | रु. १,२४,०२,१३७/- | रु. ४,८०,०००/- |

| गट क्र. | प्रभाग क्र | निविदाकाराचे नाव | वॉर्ड साफसफाई कामी मंजुर दर | नालेसफ़ाई कामी मंजुर दर |
|---|---|---|---|---|
| ५ | २७, २८, २९ | मे. राज कंन्ट्रक्शन कंपनी | रु. १,०८,११,६८७/- | रु. ३,६०,०००/- |
| ६ | ३०, ३१, ३२ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन कंपनी | रु. ९८,९४,४०२/- | रु. ३,६०,०००/- |
| ७ | १९, ४०, ४१, ४२ | मे. श्री साईगणेश कंन्ट्रक्शन कंपनी | रु. ९०,८५,०८४/- | रु. ८,४०,०००/- |
| ८ | १२, १३, १४ | मे. गणेश डेव्हलपर्स | रु. ६२,४३,७५७/- | रु. ३,५०,०००/- |
| ९ | ४७, ४८, ४९ | मे. आशापुरा कंन्ट्रक्शन कंपनी | रु. ८६,७२,९३८/- | रु. ५,५०,०००/- |
| १० | ३, ४, ५, ६ | मे. संकल्प ट्रेडिंग कंपनी | रु. १,०२,१४,८४६/- | रु. ३,००,०००/- |
| ११ | ४५, ४६ | मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन कंपनी | रु. ३७,०६,५०४/- | रु. ६,००,०००/- |
| १२ | ७, ८, ९, १०, ११ | मे. श्री साईगणेश कंन्ट्रक्शन कंपनी | रु. ९१,४५,६१५/- | रु. ६,००,०००/- |
| १३ | १५, १६, १७, १८ | मे. श्री साईगणेश कंन्ट्रक्शन कंपनी | रु. १,०५,३१,८१४/- | रु. ७,००,०००/- |
| १४ | ५०, ५२, ५३, ५४, ५५ | मे. राज कंन्ट्रक्शन कंपनी | रु. १,१४,७४,७८९/- | रु. ३,६०,०००/- |
| १५ | ५६, ५७, ५८, ५९ | मे. गुरुजी कंन्ट्रक्शन कंपनी | रु. ८६,९२,९४२/- | रु. ८,००,०००/- |
| १६ | ६०, ६३, ६४, ६५ | मे. आशापूरा कन्ट्रक्शन कपंनी | रु. ९०,३६,००१/- | रु. ६,००,०००/- |
| १७ | ६६, ६७, ६८ | मे. गुरुजी कंन्ट्रक्शन कंपनी | रु. ५४,११,१८२/- | रु. १८,००,०००/- |
| १८ | ६२, ६९, ७१ | मे. राजश्री इंन्टरप्रायझेस | रु. ६०,१८,२१२/- | रु. ६,००,०००/- |
| १९ | ७४, ७५, ७६, ७७ | मे. जय श्रीकृष्ण ट्रान्सपोर्ट | रु. ७६,८४,८४४/- | रु. १०,००,०००/- |
| २० | ७२, ७३ | मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट | रु. ५४,८५,७९०/- | रु. १२,५०,०००/- |
| २१ | ७०, ७८, ७९ | मे. राज कंन्ट्रक्शन कंपनी | रु. ९२,९०,५०५/- | रु. १२,००,०००/- |
| २२ | ५१ | मे. गणॆश अर्थ मुव्हींग कंपनी | रु. ४२,६७,७७८/- | रु. १६,११,०००/- |
| २३ | ६१ | मे. संकल्प ट्रेडिंग कंपनी | रु. ३६,५७,१९२/- | रु. २१,६०,०००/- |
| २४ | ४३, ४४ | मे. गुरुजी कंन्ट्रक्शन कंपनी | रु. ५१,५७,७१५/- | रु. ३,५०,०००/- |

वरील प्रमाणे गट निहाय प्रभाग साफसफाई व नाले सफाई करणे कामी गट क्र. ०१ ते २४ गटाकरीता आलेल्या दरास हि सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत म्हात्रे अनुमोदक :- श्रीम. हेलन गोविंद**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. :-**

निविदांना मंजुरी देणे. (आरोग्य साफसफाई विभाग)

**ठराव क्र. ११०अ :-**

शहरातील दैनंदिन प्रभाग निहाय साफसफाईची कामे अत्यावश्यक सेवेत येत असल्याने सध्या कार्यरत असलेल्या निविदाकारांस नविन वर्षाच्या कामाचा कार्यादेश देवून कामास सुरुवात करेपर्यंतच्या मुदतवाढ व या कालावधीत होणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

त्याचप्रमाणे मुदतवाढीच्या कालावधी दरम्यान किमान वेतन कायद्यानुसार भत्त्यात झालेल्या वाढीच्या फरकाची रक्कम पुढील निविदा अंतिम मंजूरी मिळून कार्यादेश देईपर्यंतच्या कालावधीतील होणाऱ्या फरकाची रक्कम निविदाकारांना अदा करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत म्हात्रे अनुमोदक :- श्रीम. हेलन गोविंद**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण १३९, निविदांना मंजूरी देणे (सार्व. बांधकाम विभाग)

**मदन उदितनारायण सिंह :-**

यह पीएमसी क्या है।

**शिवाजी बारकुंड :-**

प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्स्लटन्सी.

**मदन उदितनारायण सिंह :-**

और बीएसयुपी का फुलफॉर्म क्या है।

**शिवाजी बारकुंड :-**

बेसीक सर्विस फॉर अरबन प्युर.

**हेलन गोविंद :-**

प्रकरण क्र. १३९, गोषवाऱ्यानुसार निविदांना मंजुरी देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**बर्नट डिमेलो :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. १३९, सर्वांनुमते विषय मंजुर. मी सर्व सन्मा. सदस्यांना एक विनंती करतो की, पुढचे जे दोन-तीन विषय आहेत, १४०, १४१, आणि १४२, मा. आयुक्त साहेब आल्यानंतर आपण त्या विषयांवर चर्चा करू, तोपर्यंत आपण १४३ चा विषय घेऊ. आणि तीन विषय आपण कमिशनर साहेब आल्यानंतर चर्चा करू.

**प्रकरण क्र. १३९ :-**

निविदांना मंजूरी देणे (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १११ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा BSUP हा प्रकल्प केंद्र शासनाकडून मंजूर झाला असून प्रत्यक्षात कामे करुन घेण्याकरीता PMC नियुक्त करण्यासाठी दि. १९/१२/२००९ रोजी दै. सकाळ व हिन्दूस्थान टाईम्स या दैनिकांत निविदा प्रसिध्द झाल्या होत्या. एकूण पाच सल्लागारांनी निविदा विकत घेतल्या होत्या. परंतु, एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे सदर निविदा उघडण्यात आली नाही व फेर निविदा मागविण्यात आल्या. त्याची सुचना नोटीस दै. सकाळ व हिन्दूस्थान टाईम्सच्या दि. २६/०१/२०१० रोजीच्या अंकात प्रसिध्द झाली होती. एकूण चार निविदा विकल्या गेल्या त्यापैकी ३ निविदा दि. ०८/०२/२०१० रोजी प्राप्त झाल्या. सदर निविदा दि. ०९/०२/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित प्रतिनिधींसमोर उघडण्यात आल्या.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव | ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | मे. टेक्नो कंन्सल्टंट, नेरुल, नवी-मुंबई | २.९३ % |
| | (दर वाटाघाटीनंतर) | २.४५ % |
| २ | मे. विनायक भट, कन्सल्टींग आर्कीटेक्ट, बोरीवली, मुंबई | ३.६९ % |
| ३ | मे. विस्तार आर्कीटेक्टस्, सीबीडी, नवी-मुंबई | २.९९ % |

B.S.U.P. प्रकल्पाच्या अहवालास व रु. ३०० कोटी रक्कमेस मा. महासभेने मान्यता दिलेली आहे. प्रत्यक्षात B.S.U.P. योजनेअंतर्गत कामे करुन घेण्याकरीता PMC नेमणे आवश्यक असल्याने वरीलप्रमाणे मे. टेक्नो कंन्सल्टंट यांचे अंदाजपत्रकातील रक्कमेवर २.४५ % दर मंजूर करण्यात येत आहेत. सदर B.S.U.P. प्रकल्पाकरीता नेमण्यात येणाऱ्या ठेकेदाराच्या कामांवर देखरेख ठेवणे, देयके तयार करणे, मोजमाप, पुस्तिका सादर करणे व कामांवर नियंत्रण ठेऊन मुदतीत कामे पूर्ण करुन घेण्यात येऊन त्यांची देखील वेळोवेळी येणारी देयके प्रदानास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. हेलन गोविंद** **अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिति**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४३, मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदांना मंजुरी देणे. वाहने वाहनचालकासह, इंधनासह (संपुर्ण सेवा) भाड्याने घेणे वार्षिक ठेका निश्चित करणे.

**याकुब कुरेशी :-**

पूर्वीचा ठेका संपला का?

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, वाहने भाड्याने घेणे, याला याच्यापूर्वी सुध्दा आपण मान्यता दिलेली आहे. मग हे ॲडीशनल कशाला? या वर्षामध्ये दिलेली आहे.

**याकुब कुरेशी :-**

श्री. सावंत साहेब, मी तेच विचारतो. याच्या अगोदर मंजुरी दिलेली आहे.

**अनिल सावंत :-**

आत्ता परत आणखीन वाहनांची गरज कोणाला पडली?

**याकुब कुरेशी :-**

हे कधी सांगणार? अगोदरचे संपले, हा नवीन ठेका काढला आहे. त्याची मुदत किती होती? आणि किती वेळ अगोदर तो ठेका संपला.

**अनिल सावंत** :-

माझ्या मते यावर्षीचा मंजुरी दिलेली अहो.

**जुबेर इनामदार :-**

श्री. पाटील साहेब, आपण प्रत्येक विषय एप्रिल ते मार्च का करत नाही? इअर एन्डींग असायला पाहिजे.

**याकुब कुरेशी :-**

कधी संपला? तुम्ही माईक घ्या.

**जुबेर इनामदार :-**

एप्रिलपर्यंत मुदतवाढ घ्या आणि एप्रिल ते मार्च परत करा. पुर्ण वर्षाचे एकदा घ्या.

**दादासाहेब पाटील :-**

दि. ०६/०१ /२०१० ला ठेका संपलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

कधी संपला?

**दादासाहेब पाटील :-**

०६ जानेवारी २०१०.

**जुबेर इनामदार :-**

त्याच्यानंतरचे सध्या काय करता? लोक बिना गाडीने फिरतात.

**दादासाहेब पाटील :-**

त्याला मुदतवाढ दिलेली.

**जुबेर इनामदार :-**

कोणी दिली !

**दादासाहेब पाटील :-**

मा. आयुक्तांनी.

**जुबेर इनामदार :-**

ती मुदतवाढ तुम्ही मार्च पर्यंत घ्या. आणि नवीन वर्षामध्ये एप्रिल ते मार्च, पूर्ण वर्षाचे काढा. मध्ये - मध्ये हे चुकीचे आहे.

**दादासाहेब पाटील :-**

साहेब, आत्ता ठेका आलेलाच आहे. आपण टेंडर मागवलेले आहेत. ते सर्व फायनल झालेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

श्री. पाटील साहेब, तुम्ही ऑडीटर आहात. टेंडर मागवताना तुम्हालाही अडचण होत नाही का? आपण वर्षाचे बजेट कशाला नक्की करतो? बजेटमध्ये करायचे.

**दादासाहेब पाटील :-**

आपले अनेक ठेके असे आहेत की, वेगवेगळ्या वेळेला येतात.

**जुबेर इनामदार :-**

ऑक्ट्रॉयमध्येही तीच परिस्थिती होती. त्याच्यामध्ये आम्ही सुधार आणला. आम्ही सदस्य इथे बसून सुधार आण्याचा प्रयत्न करतो. प्रशासनाने करायचे नाही का? त्यांची भुमिका नाही का? मार्चपर्यंत घेतले असते तर काय अडचण झाली असती?

**दादासाहेब पाटील :-**

काही हरकत नाही. याच्यानंतर आपण तसे करू. ही प्रोसेस ऑलरेडी झाली.

**शिवाजी बारकुंड :-**

वर्षाची निवीदा आली.

**जुबेर इनामदार :-**

ही निविदा आली त्यांना मार्चपर्यंत घ्या.

**शिवाजी बारकुंड :-**

आज मंजुर करून पुढच्या मार्चपर्यंत घेता येईल.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, आपण हे ठेका देतो ते कॉन्ट्रॅक्टर तेच बघतो.

**मा. सभापती :-**

हा विषय आपल्याकडे आत्ता आलेला आहे. याला आपण पुढच्या वेळेला त्यापध्दतीने करतील. आत्ता विषय आपल्याकडे आलेला आहे, तो आपण मंजुर करू. फक्त गाड्यांच्या बाबतीत काही विषय असतील तर बघा. एक महिन्यासाठी मुदत वाढवून परत तो विषय आणायचा.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, हे ठेक्यामध्ये जे आहेत. दुस-यांना तुम्ही ठेका देत नाही का?

**दादासाहेब पाटील :-**

आपण सार्वजनिक वर्तमानपत्रात जाहिरात दिली आहे. दुस-यांनी यायला पाहिजे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

कोणत्या वर्तमानपत्रात दिली होती.

**दादासाहेब पाटील :-**

जनमत आणि मिड-डे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

जनमत म्हणजे हे भाईंदरचे वृत्तपत्र झाले.

**जुबेर इनामदार :-**

आपण ब-याच वाटाघाटी करतो. याच्यामध्ये वाटाघाटी करा. पुढच्या मार्चपर्यंत जाऊ द्या.

**दादासाहेब पाटील :-**

आत्ता प्रोसेस संपली.

**जुबेर इनामदार :-**

बारा महिन्यांची त्याच्यामध्ये अडचण आहे का?

**दादासाहेब पाटील :-**

पुढच्यावर्षी आपण मार्चनंतर आणू.

**जुबेर इनामदार :-**

आपण बारा महिन्याचे करतो ना. मग फेब्रुवारी महिन्यामध्ये संपेल.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, ही निविदा मंजुर करून या निविदेची मुदत एक वर्ष राहील. आणि त्याच्यानंतर मार्चला निविदा काढू आणि त्याची मुदत १ एप्रिलपासून सुरू होईल.

**जुबेर इनामदार :-**

इथे आज बोललेले उद्या कोणाला आठवण राहात नाही. मा. आयुक्त आज आहेत. सहा महिन्यानंतर जातील. त्यांचा विषय संपला त्यांचा कार्यकाळ आटपायला आला.

**निर्मला सावळे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात वाहने वाहन चालकासह इंधनासह (संपुर्ण सेवा ) भाड्याने घेणे वार्षिक निविदा जाहिर निविदा सुचना दैनिक वृत्तपत्र ''जनमत'' व .''मिड डे'' या वृतपत्रात दि.१७/१२/२००९ रोजी नोटीस प्रसिध्द केली असता खालील ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केलेल्या आहेत.

| अ.क्र. | वाहनाचा तपशिल | साईसिध्दी ट्रव्हेलर्स | | | | सिताराम ट्रव्हेलर्स | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रति महिना २५०० कि.मी. | २५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | प्रति दिवस (८० कि.मी.) | ८० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | प्रति महिना २५०० कि.मी. | २५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | प्रति दिवस (८०कि.मी.) | ८० कि.मी. नंतर प्रति कि.मी. |
| १ | मारुती इस्टीम (ए.सी.) | ३५८५० | ११.०० | १५९० | ११.०० | ३५७७५ | १०.५५ | १५७५ | १०.५५ |
| २ | मारुती ओमनी (नॉन ए.सी) | २३६५० | ७.५० | ११२१ | ७.५० | २३६०९ | ७.३० | १०५० | ७.३० |
| ३ | टाटा इंडीगो (ए.सी.) | ३६७५० | ११.०० | १५७५ | ११.०० | ३६२५० | १०.५५ | ३६७७५ | १०.५५ |
| ४ | टाटा इंडीका (ए.सी) | २५६५० | ८.२५ | १३७५ | ८.०० | २५४०० | ८.२० | २५४२१ | ८.२० |
| ५ | टाटा इंडीका (नॉन ए.सी.) | २२४५० | ७.३० | ११५० | ७.३० | २२७०० | ७.३० | ११७५ | ७.३० |
| ६ | क्वालीस (नॉन ए.सी.) | ३०७५० | ८.५० | १६९० | ८.५० | ३१२५० | ८.२० | १७५० | ८.२० |
| ७ | क्वालीस ( ए.सी.) | ३७८५० | ९.३० | १९५० | ९.३० | ३७५०० | ९.७० | २०५० | ९.७० |
| ८ | टाटा सुमो/आर्मांडा (नॉन ए.सी) | २८४५० | ८.७५ | १६२१ | ८.७५ | २८८५० | ८.२० | १५७५ | ८.२० |
| ९ | ऑटो रिक्षा | २१००० | ५.१० | ८५० | ५.१० | २०८०० | ५.६० | ८२१ | ५.६० |
| १० | ऑटो रिक्षा (ध्वनीक्षेपणासह) | २८७५० | ५.५० | ११०० | ५.५० | २९१०० | ५.६० | १०२१ | ५.६० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | टेम्पो (४०७) | ४४५०० | १८.०० | १८०० | १८.०० | ४४२५० | १५.७० | १८२५ | १५.७० |
| १२ | टेम्पो (४०७) ध्वनीक्षेपणासह) | ५१४५० | १९.०० | १९५० | १९.०० | ५१२५० | १५.७० | १९८० | १५.७० |
| १३ | ट्रक | ८५००० | २५.५० | ४२०० | २५.५० | ८६१०० | २५.३० | ३९०० | २५.३० |
| १४ | ट्रॅक्टर | ८५००० | ३१.०० | ४३५० | ३१.०० | ८६२५० | ३३.३३ | ४२५१ | ३३.३३ |

| | | विणा ट्रव्हेल्र्स | | | | **मे.सर्वस्व इंटरप्रेनर्स** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनाचा तपशिल | प्रति महिना २५०० कि.मी. | २५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | प्रति दिवस (८० कि.मी.) | ८० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | **प्रति महिना २५०० कि.मी.** | **२५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.** | **प्रति दिवस (८० कि.मी.)** | **८० कि.मी. नंतर प्रति कि.मी.** |
| १ | मारुती इस्टीम (ए.सी.) | ३५९०० | १०.५० | १५७० | १०.५० | **३५३४०** | **१०.५०** | **१५००** | **१०.५०** |
| २ | मारुती ओमनी (नॉन ए.सी) | २३५५१ | ७.२० | ११५० | ७.२० | **२३३९४** | **७** | **१०००** | **७.००** |
| ३ | टाटा इंडीगो (ए.सी.) | ३६७७५ | १०.७० | १५५० | १०.७० | **३६०००** | **१०.५०** | **१५००** | **१०.५०** |
| ४ | टाटा इंडीका (ए.सी) | २५४०० | ८.२० | १४२१ | ८.२० | **२५०००** | **८** | **१३००** | **८.००** |
| ५ | टाटा इंडीका (नॉन ए.सी.) | २२७५० | ७.२० | ११२१ | ७.२० | **२२०००** | **७** | **१०५०** | **७.००** |
| ६ | क्वालीस (नॉन ए.सी.) | ३११११ | ८.२० | १७२५ | ८.२० | **३०५००** | **८** | **१६५०** | **८.००** |
| ७ | क्वालीस ( ए.सी.) | ३७८५१ | ९.३० | २०२० | ९.३० | **३७२००** | **९** | **१९००** | **९.००** |
| ८ | टाटा सुमो/आर्माडा (नॉन ए.सी) | २८७५१ | ८.२० | १६०० | ८.२० | **२८०००** | **८** | **१५५०** | **८.००** |
| ९ | ऑटो रिक्षा | २०८०० | ५.२५ | ७७५ | ५.२५ | **२००००** | **५** | **७००** | **५.००** |
| १० | ऑटो रिक्षा (ध्वनीक्षेपणासह) | २९५०० | ५.२५ | १०५० | ५.२५ | **२८०००** | **५** | **९५०** | **५.००** |
| ११ | टेम्पो (४०७) | ४३९५० | १६.०० | १८९० | १६.०० | **४३७९४** | **१५** | **१७५०** | **१५.००** |
| १२ | टेम्पो (४०७) ध्वनीक्षेपणासह) | ५१५५१ | १६.०० | २००० | १६.०० | **५०८२०** | **१५** | **१९००** | **१५.००** |
| १३ | ट्रक | ८६५०० | २५.०० | ३५०० | २५.०० | **८५८५०** | **२५** | **३८५०** | **२५.००** |
| १४ | ट्रॅक्टर | ८६५०० | ३०.०० | ३५०० | ३०.०० | **८५८५०** | **३०** | **४०५०** | **३०.००** |

वरील मुदतीत सादर झालेल्या निविदांचे दर जास्त असल्याने सदर निविदेतील सर्वात कमी असलेल्या निविदा धारकांस श्री.सर्वस्वी इंटरप्रेनर्स यांनी वाटाघाटी अंती सरसकट ५% कमी दराने खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहे.

| | | **मे.सर्वस्व इंटरप्रेनर्स** | | | | **वाटाघाटी अंती दर** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **वाहनाचा तपशिल** | **प्रति महिना २५०० कि.मी.** | **प्रति महिना २५०० कि.मी.** | **२५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.** | **प्रति दिवस (८० कि.मी.)** | **प्रति महिना २५०० कि.मी.** | **२५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.** | **प्रति दिवस (८० कि.मी.)** | **८० कि.मी. नंतर प्रति कि.मी.** |
| १ | मारुती इस्टीम (ए.सी.) | **३५३४०** | **१०.५०** | **१५००** | **१०.५०** | **३३५७०.००** | **१०.००** | **१४२५.००** | **१०.००** |
| २ | मारुती ओमनी (नॉन ए.सी) | **२३३९४** | **७** | **१०००** | **७.००** | **२२२२०.००** | **६.७५** | **९५०.००** | **६.७५** |
| ३ | टाटा इंडीगो (ए.सी.) | **३६०००** | **१०.५०** | **१५००** | **१०.५०** | **३४२००.००** | **१०.००** | **१४२५.००** | **१०.००** |
| ४ | टाटा इंडीका (ए.सी) | **२५०००** | **८** | **१३००** | **८.००** | **२३७५०.००** | **७.७५** | **१२३५.००** | **७.७५** |
| ५ | टाटा इंडीका (नॉन ए.सी.) | **२२०००** | **७** | **१०५०** | **७.००** | **२०९००.००** | **६.७५** | **१०००.५०** | **६.७५** |
| ६ | क्वालीस (नॉन ए.सी.) | **३०५००** | **८** | **१६५०** | **८.००** | **२८५००.००** | **७.७५** | **१५५०.००** | **७.७५** |
| ७ | क्वालीस ( ए.सी.) | **३७२००** | **९** | **१९००** | **९.००** | **३५३४०.००** | **८.५०** | **१८००.००** | **८.५०** |
| ८ | टाटा सुमो/आर्माडा (नॉन ए.सी) | **२८०००** | **८** | **१५५०** | **८.००** | **२६६००.००** | **७.७५** | **१४२०.००** | **७.७५** |
| ९ | ऑटो रिक्षा | **२००००** | **५** | **७००** | **५.००** | **१९०००.००** | **५.००** | **६६५.००** | **५.००** |
| १० | ऑटो रिक्षा (ध्वनीक्षेपणासह) | **२८०००** | **५** | **९५०** | **५.००** | **२६६००.००** | **५.००** | **९००.००** | **५.००** |
| ११ | टेम्पो (४०७) | **४३७९४** | **१५** | **१७५०** | **१५.००** | **४१६००.००** | **१४.००** | **१६६०.००** | **१४.००** |
| १२ | टेम्पो (४०७) ध्वनीक्षेपणासह) | **५०८२०** | **१५** | **१९००** | **१५.००** | **४८२८०.००** | **१४.००** | **१८००.००** | **१४.००** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | ट्रक | **८५८५०** | **२५** | **३८५०** | **२५.००** | **८०७५०.००** | **२४.००** | **३३२५.००** | **२४.००** |
| १४ | ट्रक्टर | **८५८५०** | **३०** | **४०५०** | **३०.००** | **८०७५०.००** | **२८.००** | **३३२५.००** | **२८.००** |

मा.आयुक्त सों., यांनी मंजुरी दिलेल्या मे.सर्वस्व इंटरप्रेनर्स यांच्या वाटाघाटी अंती सादर केलेल्या दरास वार्षिक निविदा मंजुर करणेस तसेच पुढील कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ देण्यास हि सभा मंजुरी देत आहे.

**याकुब कुरेशी :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

याच्यामध्ये जीपीआरएस सिस्टम बसवतात का?

**मदन उदितनारायण सिंह :-**

जीपीआरएस बैठा सकते है। जीपीआरएस बैठाइए।

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. १४३, दुरूस्तीसह विषय मंजुर करण्यांत येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. १४३ :-**

मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदांना मंजुरी देणे. वाहने वाहनचालकासह, इंधनासह (संपुर्ण सेवा) भाड्याने घेणे वार्षिक ठेका निश्चित करणे.

**ठराव क्र. ११२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात वाहने वाहन चालकासह इंधनासह (संपुर्ण सेवा ) भाड्याने घेणे वार्षिक निविदा जाहिर निविदा सुचना दैनिक वृत्तपत्र ‘‘जनमत’’ व .‘‘मिड डे’’ या वृत्तपत्रात दि.१७/१२/२००९ रोजी नोटीस प्रसिध्द केली असता खालील ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

| **अ.क्र.** | **वाहनाचा तपशिल** | **साईसिध्दी ट्रव्हेर्ल्स** | | | | **सिताराम ट्रव्हेर्ल्स** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **प्रति महिना २५०० कि.मी.** | **२५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.** | **प्रति दिवस (८० कि.मी.)** | **८० कि.मी. नंतर प्रति कि.मी.** | **प्रति महिना २५०० कि.मी.** | **२५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.** | **प्रति दिवस (८०कि.मी.)** | **८० कि.मी. नंतर प्रति कि.मी.** |
| १ | मारुती इस्टीम (ए.सी.) | ३५८५० | ११.०० | १५९० | ११.०० | ३५७७५ | १०.५५ | १५७५ | १०.५५ |
| २ | मारुती ओमनी (नॉन ए.सी) | २३६५० | ७.५० | ११२१ | ७.५० | २३६०९ | ७.३० | १०५० | ७.३० |
| ३ | टाटा इंडीगो (ए.सी.) | ३६७५० | ११.०० | १५७५ | ११.०० | ३६२५० | १०.५५ | ३६७७५ | १०.५५ |
| ४ | टाटा इंडीका (ए.सी) | २५६५० | ८.२५ | १३७५ | ८.०० | २५४०० | ८.२० | २५४२१ | ८.२० |
| ५ | टाटा इंडीका (नॉन ए.सी.) | २२४५० | ७.३० | ११५० | ७.३० | २२७०० | ७.३० | ११७५ | ७.३० |
| ६ | क्वालीस (नॉन ए.सी.) | ३०७५० | ८.५० | १६९० | ८.५० | ३१२५० | ८.२० | १७५० | ८.२० |
| ७ | क्वालीस ( ए.सी.) | ३७८५० | ९.३० | १९५० | ९.३० | ३७५०० | ९.७० | २०५० | ९.७० |
| ८ | टाटा सुमो/आर्माडा (नॉन ए.सी) | २८४५० | ८.७५ | १६२१ | ८.७५ | २८८५० | ८.२० | १५७५ | ८.२० |
| ९ | ऑटो रिक्षा | २१००० | ५.१० | ८५० | ५.१० | २०८०० | ५.६० | ८२१ | ५.६० |
| १० | ऑटो रिक्षा (ध्वनीक्षेपणासह) | २८७५० | ५.५० | ११०० | ५.५० | २९१०० | ५.६० | १०२१ | ५.६० |
| ११ | टेम्पो (४०७) | ४४५०० | १८.०० | १८०० | १८.०० | ४४२५० | १५.७० | १८२५ | १५.७० |
| १२ | टेम्पो (४०७) ध्वनीक्षेपणासह) | ५१४५० | १९.०० | १९५० | १९.०० | ५१२५० | १५.७० | १९८० | १५.७० |
| १३ | ट्रक | ८५००० | २५.५० | ४२०० | २५.५० | ८६१०० | २५.३० | ३९०० | २५.३० |
| १४ | ट्रक्टर | ८५००० | ३१.०० | ४३५० | ३१.०० | ८६२५० | ३३.३३ | ४२५१ | ३३.३३ |

| | | **विणा ट्रव्हेर्ल्स** | | | | **मे.सर्वर्स्व इंटरप्रेनर्स** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनाचा तपशिल | प्रति महिना २५०० कि.मी. | २५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | प्रति दिवस (८० कि.मी.) | ८० कि.मी. नंतर प्रति कि.मी. | **प्रति महिना २५०० कि.मी.** | **२५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.** | **प्रति दिवस (८० कि.मी.)** | **८० कि.मी. नंतर प्रति कि.मी.** |
| १ | मारुती इस्टीम (ए.सी.) | ३५९०० | १०.५० | १५७० | १०.५० | **३५३४०** | **१०.५०** | **१५००** | **१०.५०** |
| २ | मारुती ओमनी (नॉन | २३५५१ | ७.२० | ११५० | ७.२० | **२३३९४** | **७** | **१०००** | **७.००** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ए.सी) | | | | | | | | |
| ३ | टाटा इंडीगो (ए.सी.) | ३६७७५ | १०.७० | १५५० | १०.७० | **३६०००** | **१०.५०** | **१५००** | **१०.५०** |
| ४ | टाटा इंडीका (ए.सी) | २५४०० | ८.२० | १४२१ | ८.२० | **२५०००** | **८** | **१३००** | **८.००** |
| ५ | टाटा इंडीका (नॉन ए.सी.) | २२७५० | ७.२० | ११२१ | ७.२० | **२२०००** | **७** | **१०५०** | **७.००** |
| ६ | क्वालीस (नॉन ए.सी.) | ३११११ | ८.२० | १७२५ | ८.२० | **३०५००** | **८** | **१६५०** | **८.००** |
| ७ | क्वालीस ( ए.सी.) | ३७८५१ | ९.३० | २०२० | ९.३० | **३७२००** | **९** | **१९००** | **९.००** |
| ८ | टाटा सुमो/आर्माडा (नॉन ए.सी) | २८७५१ | ८.२० | १६०० | ८.२० | **२८०००** | **८** | **१५५०** | **८.००** |
| ९ | ऑटो रिक्षा | २०८०० | ५.२५ | ७७५ | ५.२५ | **२००००** | **५** | **७००** | **५.००** |
| १० | ऑटो रिक्षा (ध्वनीक्षेपणासह) | २९५०० | ५.२५ | १०५० | ५.२५ | **२८०००** | **५** | **९५०** | **५.००** |
| ११ | टेम्पो (४०७) | ४३९५० | १६.०० | १८९० | १६.०० | **४३७९४** | **१५** | **१७५०** | **१५.००** |
| १२ | टेम्पो (४०७) ध्वनीक्षेपणासह) | ५१५५१ | १६.०० | २००० | १६.०० | **५०८२०** | **१५** | **१९००** | **१५.००** |
| १३ | ट्रक | ८६५०० | २५.०० | ३५०० | २५.०० | **८५८५०** | **२५** | **३८५०** | **२५.००** |
| १४ | ट्रक्टर | ८६५०० | ३०.०० | ३५०० | ३०.०० | **८५८५०** | **३०** | **४०५०** | **३०.००** |

वरील मुदतीत सादर झालेल्या निविदांचे दर जास्त असल्याने सदर निविदेतील सर्वात कमी असलेल्या निविदा धारकांस श्री.सर्वस्वी इंटरप्रेनर्स यांनी वाटाघाटी अंती सरसकट ५% कमी दराने खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहे.

| | | **मे.सर्वर्स्व इंटरप्रेनर्स** | | | | **वाटाघाटी अंती दर** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **वाहनाचा तपशिल** | **प्रति महिना २५०० कि.मी.** | **प्रति महिना २५०० कि.मी.** | **२५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.** | **प्रति दिवस (८० कि.मी.)** | **प्रति महिना २५०० कि.मी.** | **२५०० कि.मी. नंतर प्रति कि.मी.** | **प्रति दिवस (८० कि.मी.)** | **८० कि.मी. नंतर प्रति कि.मी.** |
| १ | मारुती इस्टीम (ए.सी.) | **३५३४०** | **१०.५०** | **१५००** | **१०.५०** | **३३५७०.००** | **१०.००** | **१४२५.००** | **१०.००** |
| २ | मारुती ओमनी (नॉन ए.सी) | **२३३९४** | **७** | **१०००** | **७.००** | **२२२२०.००** | **६.७५** | **९५०.००** | **६.७५** |
| ३ | टाटा इंडीगो (ए.सी.) | **३६०००** | **१०.५०** | **१५००** | **१०.५०** | **३४२००.००** | **१०.००** | **१४२५.००** | **१०.००** |
| ४ | टाटा इंडीका (ए.सी) | **२५०००** | **८** | **१३००** | **८.००** | **२३७५०.००** | **७.७५** | **१२३५.००** | **७.७५** |
| ५ | टाटा इंडीका (नॉन ए.सी.) | **२२०००** | **७** | **१०५०** | **७.००** | **२०९००.००** | **६.७५** | **१०००.५०** | **६.७५** |
| ६ | क्वालीस (नॉन ए.सी.) | **३०५००** | **८** | **१६५०** | **८.००** | **२८५००.००** | **७.७५** | **१५५०.००** | **७.७५** |
| ७ | क्वालीस ( ए.सी.) | **३७२००** | **९** | **१९००** | **९.००** | **३५३४०.००** | **८.५०** | **१८००.००** | **८.५०** |
| ८ | टाटा सुमो/आर्माडा (नॉन ए.सी) | **२८०००** | **८** | **१५५०** | **८.००** | **२६६००.००** | **७.७५** | **१४२०.००** | **७.७५** |
| ९ | ऑटो रिक्षा | **२००००** | **५** | **७००** | **५.००** | **१९०००.००** | **५.००** | **६६५.००** | **५.००** |
| १० | ऑटो रिक्षा (ध्वनीक्षेपणासह) | **२८०००** | **५** | **९५०** | **५.००** | **२६६००.००** | **५.००** | **९००.००** | **५.००** |
| ११ | टेम्पो (४०७) | **४३७९४** | **१५** | **१७५०** | **१५.००** | **४१६००.००** | **१४.००** | **१६६०.००** | **१४.००** |
| १२ | टेम्पो (४०७) ध्वनीक्षेपणासह) | **५०८२०** | **१५** | **१९००** | **१५.००** | **४८२८०.००** | **१४.००** | **१८००.००** | **१४.००** |
| १३ | ट्रक | **८५८५०** | **२५** | **३८५०** | **२५.००** | **८०७५०.००** | **२४.००** | **३३२५.००** | **२४.००** |
| १४ | ट्रक्टर | **८५८५०** | **३०** | **४०५०** | **३०.००** | **८०७५०.००** | **२८.००** | **३३२५.००** | **२८.००** |

मा.आयुक्त सों., यांनी मंजुरी दिलेल्या मे.सर्वस्व इंटरप्रेनर्स यांच्या वाटाघाटी अंती सादर केलेल्या दरास वार्षिक निविदा मंजुर करणेस तसेच पुढील कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ देण्यास हि सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. निर्मला सावळे** **अनुमोदक :- श्री. याकुब कुरेशी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अनिल सावंत :-**

बीपीएमसी ॲक्ट २ (क) खाली उत्पन्न वाढीचा विषय आहे. तर मी विनंती करतो की, हे विषय संपल्यानंतर तो विषय घ्यावा.

**मा. सभापती :-**

आपले दोन विषय संपू द्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४४, मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावास मंजूरी देणे. (संगणक विभाग) मिरा भाईंदर महानगरपालिकेचा संगणक विभागाकरिता कन्झुमेबल स्टेशनरी (उदा. टोनर, कार्टेज) इत्यादीची खरेदी शासन दराने करणेबाबत.

**जुबेर इनामदार :-**

कन्झ्युमेबल साहित्य म्हणजे काय? वॉट इझ कन्झुमेबली प्रॉडेक्ट?

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, आपण तीन झेरॉक्स मशिन नवीन घेतल्या आहेत ना? त्यातील किती चालू आहेत?

**नगरसचिव :-**

तीनही चालू आहेत.

**अनिल सावंत :-**

तीन ही चालू आहेत.

**अनिल सावंत :-**

सकाळी रिपोर्ट मिळाला होता की, चालू नाहीत.

**नगरसचिव :-**

चालू आहेत. त्याच्यावरच झेरॉक्स काढल्या.

**अनिल सावंत :-**

मग ही झेरॉक्सची काय परिस्थिती आहे. हे रिडेबल आहे का? वाचता तरी येते का?

**जुबेर इनामदार :-**

काट्रेज नवीन घेता का?

**राजकुमार घरत :-**

नवीन साहित्य घेण्यात आलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

काट्रेज, टोनर सर्व नवीनच घेता? त्यांना आपण रियुज करू शकतो.

**राजकुमार घरत :-**

रियुज करू शकतो.

**जुबेर इनामदार :-**

ग्रीन रिव्हॉल्युशन चालू आहे. त्यांना रियुज केले जाते. रिफील केले जाते. त्यांच्या ज्या कंपनी आहे त्यांना गाठायचा तुम्ही प्रयत्न केला का?

**राजकुमार घरत :-**

रिफील केले आहेत. आपण रिफीलपण करून घेतले.

**जुबेर इनामदार :-**

कोणाकडून करून घेतले?

**राजकुमार घरत :-**

मे. व्होरा इंटरप्रायझेसकडून रिफील करून घेतो.

**जुबेर इनामदार :-**

हा कोण आहे?

**राजकुमार घरत :-**

व्होरा इंटरप्रायझेस ठेकेदार आहे. त्याच्याकडून दरपत्रकाने रिफीलपण करून घेतले.

**जुबेर इनामदार :-**

कोणते घेता? म्हणजे सर्व कार्टेज, टोनर? इंकजेट, लेझर?

**राजकुमार घरत :-**

सर्व कारटेज, टोनर रिफील करून घेतो.

**जुबेर इनामदार :-**

कोणाची मान्यता घेतली? आमच्याकडे स्टॅंडींगमध्ये तर विषय आलाच नाही.

**राजकुमार घरत :-**

तो खर्च पन्नास हजाराच्या आतमध्ये आहे. रिफीलचा खर्च कमी येतो.

**जुबेर इनामदार :-**

तरीही एवढे जास्त लागतात?

**राजकुमार घरत :-**

साहेब, हे आपण नवीन मागवलेले आहेत. हे शासनाच्या दराने घेतले आहेत.

**मा. सभापती :-**

आपल्याकडे अवलोकनार्थ आलेला आहे. तो विषय मंजुरच करायचा आहे. सचिव साहेब पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. १४४ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावास मंजूरी देणे. (संगणक विभाग) मिरा भाईंदर महानगरपालिकेचा संगणक विभागाकरिता कन्झुमेबल स्टेशनरी (उदा. टोनर, कार्टेज) इत्यादीची खरेदी शासन दराने करणेबाबत.

**ठराव क्र. ११३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील संगणक विभागामार्फत कर व पाणी पुरवठा कर विभागाची मागणी बिलासंबंधी कार्यवाही करण्यांत येते. तसेच महानगरपालिकेच्या विविध विभागांना मागणीनुसार सदर संगणकीय साहित्य (उदा. टोनर, कारटेज) उपलब्ध करुन देण्यांत येते. सदर संगणकीय कन्झ्युमेबल साहित्य खरेदी शासन निर्णय क्र. डीआयटी/२००८/सीआर-६०-३९, दि. ०१/०६/२००९ या दरपत्रकानुसार, मे. बॉन मेअर कॉम्प्युटर्स यांचे कडून खरेदी करण्यास मा. आयुक्त सो., यांनी दि. २४/०८/२००९ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर खरेदी करण्यास एकूण रु. ०२,४३,५२५/- एवढा खर्च झालेला आहे. उपरोक्त प्रस्तावास कार्यवाही करण्यास मा. स्थायी समिती मान्यता देत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४५, मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (संगणक विभाग) - मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विविध विभागातील उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या प्रिंटर (मोठे व लहान) करिता लागणारे कन्झुमेबल साहित्य पुरवठा करणेबाबत.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब, एक प्रिंटचा खर्च आपल्या एक रूपया वीस पैसे येतो?

**मा. सभापती :-**

१४५ हा देखील अवलोकनार्थ आहे. चर्चा करा. हा विषय देखील मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १४५ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (संगणक विभाग) - मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विविध विभागातील उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या प्रिंटर (मोठे व लहान) करिता लागणारे कन्झुमेबल साहित्य पुरवठा करणेबाबत.

**ठराव क्र. ११४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत सन २००२-०३ पासून विविध विभागांना व मिरा भाईंदर मनपा संगणक विभागाकरीता भांडार व संगणक विभागामार्फत वेगवेगळे मोठे व लहान प्रिंटर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

सदर प्रिंटर्रस करीता लागणार खरेदी खर्च, दुरुस्ती खर्च, स्पेअर पार्टस खरेदी किंवा सदर प्रिंटरर्स करीता लागणारा टोनर व कारटेज करीता लागणारा खर्च एकत्रित केल्यास सदर खर्च नवीन प्रिंटर खरेदी करीता लागणारा खर्चा पेक्षा जास्त असल्याचे दिसून आलेले आहे. सदर खर्च कमी करणे बाबत मा. आयुक्त सो., व मा. स्थायी समितीने वारंवार संगणक विभागास आदेश व सूचना दिलेले आहेत. वरील प्रकरणी दि. १५/१२/२००९ रोजी मे. अे. बी. कॉरटेज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने वेगवेगळ्या विभागात कार्यन्वित प्रिंटरर्स करीता लागणारे टोनर व कारटेज मे. अे. बी. कॉरटेज प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून घेतल्यावर सदर प्रिंटरर्सची देखभाल दुरुस्ती विनाशुल्क करुन देणेबाबत तयारी दर्शविलेली आहे. मे. अे. बी. कॉरटेज प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमार्फत सदर टोनर व कारटेज खरेदी कामी येणारा खर्च २०% कपात होणार आहे. तसेच सदर प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे हॅवी ड्युटी प्रिंटरवरील खर्च कमी करण्यासाठी खर्च मे. अे. बी. कॉरटेज प्रायव्हेट लिमिटेड कंपनी कडून कार्यालयामध्ये बसवून घेतल्यास प्रति प्रिंट रु. १.२० पै/- एवढा खर्च होणार आहे.

तशी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ५ नियम २(२) च्या पंरतुकानुसार निविदा शिवाय संविदा करणे बाबत मा. आयुक्त सो., यांनी दि. २०/०१/२०१० रोजी मान्यता दिलेली आहे.

सदर कामी १० लाखापर्यंत अंदाजित (अधिकतम) खर्च अपेक्षित आहे. उपरोक्त प्रस्तावास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये सदर कार्यवाही करण्यास मा. स्थायी समिती मान्यता देत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अनिल सावंत :-**

विषय संपले का?

**मा. सभापती :-**

होय विषय संपले.

**अनिल सावंत :-**

२ (क) खाली जो प्रस्ताव आहे. म्हणजे शहरामध्ये ज्या ओव्हरहेड वायर्स टाकलेल्या आहेत. त्याबद्दलचा २ (क) खाली विषय आहे मी तो ठराव वाचतो.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य, आपल्याकडे एक महत्वाचा विषय आलेला आहे. सन्मा. श्री. मदन सिंह जी, आपने पास एक सब्जेक्ट आया है, १४६ सेक्शन मे, मगर के के अंतर्गत एक सब्जेक्ट आया है। उसे पढते है महानगरपालिका के बजेट मे आना बहोत जरुरी है। इसके लिए यह विषय हम सर्वानुमते लेते है।

**दिपक खांबीत :-**

साहेब, याच्यामध्ये गेल्या तीन वर्षाचे पैसे यायचे पेन्डींग आहेत. ते ६३ लाख आपल्याकडे येतील आणि चालू वर्षाचे २१ असे ८४ लाख रूपये येतील. जुना २००७ ला सर्व्हे केला त्याप्रमाणे आज जो सर्व्हे केला तर उत्पन्न एकच्या वर जाईल. त्याप्रमाणे सर्व्हे करून त्याप्रमाणे तुम्ही जे रेट मंजुर कराल, त्याप्रमाणे वसुली करू. आपले उत्पन्न एक कोटीचे होईल.

**प्रविण पाटील :-**

या शहरामध्ये फक्त एअरटेलचेच केबल आहे. दुसऱ्या कुठल्या कंपनीचे केबल नाही?

**जुबेर इनामदार :-**

एअरटेल नाही एरिअल फायबर.

**प्रविण पाटील :-**

दुसऱ्या कोणत्या कंपनीचे केबल नाही की, ज्याची परवानगी घेतली किंवा घेतली नाही?

**दिपक खांबीत :-**

एअरटेल आहे, व्होडाफोन आहे.

**प्रविण पाटील :-**

मग ज्याच्या परवानगी घेतल्या त्याचे उत्पन्न वगैरे काय?

**दिपक खांबीत :-**

त्या खालून टाकल्या आहेत. त्या परमिशन घेतल्या आहेत. या वरून टाकले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, ते वरून टाकतात ते बधितले का? बंडलच्या बंडल लटकत सोडतात.

**दिपक खांबीत :-**

म्हणून आत्ता आपण कंट्रोल करणार. पूर्वी ते असेच टाकले आहेत आणि वापरतात. आत्ता आपण त्यांना परमिशन देणार आणि पैसे रिपेरिंग करणार.

**जुबेर इनामदार :-**

आपले पोलचे फायनल झालेले नाही ना?

**दिपक खांबीत :-**

हे रिलायन्सचेच सगळे केबल आहेत. रिलायन्सला ते टाकून देतात. बाकी टाकायला देत नाहीत.

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी मे. इन्फोमॅजिक सर्व्हिस प्रा.लि. कंपनी मार्फत सध्या अस्तित्वात असलेल्या स्ट्रीट लाईट पोल वरुन तसेच काही ठिकाणी नव्याने पोल उभारुन Arial Fiber केबल टाकणे साठी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर कामी कोणत्याही प्रकारची रस्ता खोदाई करण्यात येणार नाही. सदर कंपनीमार्फत मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सुध्दा वरीलप्रमाणे Arial Fiber केबल टाकण्यात आलेली आहे. त्याबदल्यात सदर कंपनीमार्फत प्रती कि.मी साठी प्रती वर्षी रु.३०,०००/- व प्रतिपोल रु.१००/- इतके भाडे आकरण्यात येते. त्यानुसार सदर कंपनीनी मिरा भाईंदर महानगरपालिके क्षेत्रात एकूण ६९.९२ कि.मी इतक्या लांबीची Arial Fiber केबल टाकण्यासाठी परवानगी मागण्यात आलेली आहे. त्यानुसार जर मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर वरील प्रमाणे दर आकारणी केल्यास रु.२०,९७,६००/- व

रु.३५,४००/- पोलचे भाडे प्रतीवर्षी महानगरपालिकेस अपेक्षित आहे. तसेच सदर दर आकरणीमध्ये त्यानंतर प्रतीवर्षी ५ टक्के दर वाढ करण्यात येणार आहे.

तरी वरील सर्व बाबींचा मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर वरील प्रमाणे दर आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच शहरातील इतर केबल धारकांनी टाकलेल्या एरियल फायबर ऑप्टीक केबल मालकांशी देखिल चर्चा करुन त्यांच्याकडून सदर दरानुसार रक्कम वसुल करणेबाबत प्रशासनाने निर्णय घ्यावा.

**याकुब कुरेशी :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. १४६ कलम २(क) अन्वये आलेला विषय सर्वानुमते वाचून मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १४६ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची (ड) मधील प्रकरण २(१) के अन्वये प्रस्ताव - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्ट्रीट लाईट पोल वरुन Arial Fiber Cable टाकणे बाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. ११५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी मे. इन्फोमॅजिक सर्व्हिस प्रा.लि. कंपनी मार्फत सध्या अस्तित्वात असलेल्या स्ट्रीट लाईट पोल वरुन तसेच काही ठिकाणी नव्याने पोल उभारुन Arial Fiber केबल टाकणे साठी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर कामी कोणत्याही प्रकारची रस्ता खोदाई करण्यात येणार नाही. सदर कंपनीमार्फत मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सुध्दा वरीलप्रमाणे Arial Fiber केबल टाकण्यात आलेली आहे. त्याबदल्यात सदर कंपनीमार्फत प्रती कि.मी साठी प्रती वर्षी रु.३०,०००/- व प्रतिपोल रु.१००/- इतके भाडे आकरण्यात येते. त्यानुसार सदर कंपनीनी मिरा भाईंदर महानगरपालिके क्षेत्रात एकूण ६९.९२ कि.मी इतक्या लांबीची Arial Fiber केबल टाकण्यासाठी परवानगी मागण्यात आलेली आहे. त्यानुसार जर मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर वरील प्रमाणे दर आकारणी केल्यास रु.२०,९७,६००/- व रु.३५,४००/- पोलचे भाडे प्रतीवर्षी महानगरपालिकेस अपेक्षित आहे. तसेच सदर दर आकरणीमध्ये त्यानंतर प्रतीवर्षी ५ टक्के दर वाढ करण्यात येणार आहे.

तरी वरील सर्व बाबींचा मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर वरील प्रमाणे दर आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच शहरातील इतर केबल धारकांनी टाकलेल्या एरियल फायबर ऑप्टीक केबल मालकांशी देखिल चर्चा करुन त्यांच्याकडून सदर दरानुसार रक्कम वसुल करणेबाबत प्रशासनाने निर्णय घ्यावा.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत** **अनुमोदक :- श्री. याकुब कुरेशी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अनिल सावंत :-**

२ (क) खाली माझा दुसरा प्रस्ताव आहे. स्थायी समिती सदस्यांकरीता अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रकल्प राबविणे, नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे करीता दरवर्षी शहराबाहेरील विविध स्थळांना भेटी देऊन त्या भागातील प्रकल्पांचा अभ्यास करता येतो. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत अशाप्रकारे प्रकल्पाचे नियोजन करताना त्याचा उपयोग होत असतो. अंदमान व निकोबार येथे वन्य जीवन, वृक्ष हिरवळ तसेच नव्याने सुरु असलेल्या प्रकल्पांना भेटी देऊन अभ्यास करण्याकरीता मा. स्थायी समिती सदस्य, अधिकारी व कर्मचारी असे मिळून २२ जणांचा दौरा आयोजित करण्यास व अपेक्षित खर्चास देखील ही सभा मंजूरी देत आहे. सदर कामी अग्रीम रकमेच्या प्रदानास ही सभा मंजूरी देत आहे.

**बर्नड डिमेलो :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. १४७ कलम २(क) अन्वये आलेला विषय सर्वानुमते वाचून मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १४७ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची (ड) मधील प्रकरण २(१) के अन्वये प्रस्ताव - स्थायी समिती सदस्यांकरीता अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत.

**ठराव क्र. ११६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रकल्प राबविणे, नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे करीता दरवर्षी शहराबाहेरील विविध स्थळांना भेटी देऊन त्या भागातील प्रकल्पांचा अभ्यास करता येतो. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत अशाप्रकारे प्रकल्पाचे नियोजन करताना त्याचा उपयोग होत असतो. अंदमान व निकोबार येथे वन्य जीवन, वृक्ष हिरवळ तसेच नव्याने सुरु असलेल्या प्रकल्पांना भेटी देऊन अभ्यास करण्याकरीता मा. स्थायी समिती सदस्य, अधिकारी व कर्मचारी असे मिळून २२ जणांचा दौरा आयोजित करण्यास व अपेक्षित खर्चास देखील ही सभा मंजूरी देत आहे. सदर कामी अग्रीम रकमेच्या प्रदानास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत** **अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जुबेर इनामदारः-**

मा. सभापती साहेब, लॅपटॉपचे काय झाले? आम्ही लॅपटॉपबद्दल तरतुद केलेली आहे. मा. स्थायी समितीच्या सर्व सन्मा. सदस्यांना लॅपटॉप लागेल.

**मा. सभापती :-**

बजेटके टाईम इस बारे मे चर्चा करते है।

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४०, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९५ अन्वये “अ'' + “क'' + “अंध व अपंग'' + “महिला बालकल्याण'' + “JNNURM'' + “P'' अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे. मा. आयुक्त साहेब, सादर करित आहेत. कृपया सन्मा. सदस्यांनी मा. सभापतींच्या बाजूला यावे. प्रकरण क्र. १४१, परिवहन अंदाजपत्रक “B''मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९७ अन्वये मा. स्थायी समितीस सादर करणे. परिवहनचे बजेट सबमिट करीत आहे.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब, बजेटवर निवेदन देतील. त्यानंतर आपण चर्चेला सुरुवात करु.

**मा. आयुक्त :-**

**मा. सभापती महोदय, मा. स्थायी समितीचे** सर्व सन्माननीय सदस्य, तसेच उपस्थित अधिकारी व कर्मचारी वर्ग, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेचे ''अ'' ''क'' व वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००९-१० चे सुधारीत व सन २०१०-११ चे मूळ अंदाजपत्रक तसेच **JNNURM** मधील **Reformas** नुसार तयार करण्यात आलेले **JNNURM/अंधः अंपग/ महिला व बालकल्याण/ “P” अंदाजपत्रक** एकूण जमा बाजू ५२१ कोटी ६१ लाख २२ हजार व एकूण खर्च बाजू ५२१ कोटी ५६ लाख २२ हजार व ५ लक्ष शिलकी अंदाजपत्रक सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

**<u>अर्थसंकल्पातील वैशिष्टयपूर्ण मुद्दे खालीलप्रमाणे</u>**

**१) भुयारी गटार योजना :-** मनपाने केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या मदतीने मागील वर्षपासून रू. ४९१ कोटी रक्कमेचे भुयारी गटार योजनेचे काम सुरू झालेले आहे. यासाठी **MMRDA** ने २२६ कोटी रूपयांचे कर्ज मंजूर केलेले आहे. योजना पूर्ण झाल्यानंतर शहराचे स्वच्छतेमध्ये भर पडेल तसेच याद्वारे पाण्याचे रिसायकलिंग करून तयार होणारे पाणी गार्डन, इंन्डस्ट्रीज व शौचालयाचे फ्लॅश यामध्ये वापरण्यात येणार असल्याने शहरामध्ये अगोदरच कमी पाणीपुरवठा होत आहे व अशा प्रकारे पाण्याचा वापर झाल्यास पाण्याची बचत होईल.

या योजनेवर सन २०१०-११ मध्ये अंदाजपत्रकातील तरतुद पुढीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| **१) केंद्र/राज्यशासन अनुदान** | - | **४१४२.०० लाख** |
| **२) MMRDA कडील कर्ज** | - | **१४८००.०० लाख** |
| **३) मनपाचा स्वतःचा हिस्सा** | - | **१२००.०० लाख** |

२) **वॉर्ड साफसफाई** :- मनपाच्या सर्व प्रभागांची दैनंदिन साफसफाई व नालेसफाई यासाठीचा यापूर्वीचा वार्षिक एकूण खर्च जवळपास २२ कोटी आहे. किमान वेतन कायद्यानुसार मजुरीचा दर १४१ रू. असा होता. आज किमान वेतन कायद्यानुसार मजुरीचा दर हा २११ रू. आहे व यावर्षी काढलेल्या निविदेमध्ये दैनंदिन साफसफाई व वर्षातून दोन वेळा नालेसफाई यांचा खर्च २० कोटीच्या आसपास येईल. याचे कंत्राट देताना ठेकेदाराने किती लेबर लावावेत अशी अट काढून टाकण्यात आलेली आहे. त्यांनी लेबर मशिनरी वा अन्य मार्गांनी शहराची साफसफाई नालेसफाई ठरवून दिलेल्या ठेका रकमेतूनच करून द्यावयाची आहे. यामुळे वर्षाकाठी ९ कोटी रूपये बचत होणार आहे.

अंदाजपत्रकात २० कोटी रूपये सन २०१०-११ साठी तरतुद करण्यात आलेली आहे.

३) **निर्मल एम एम आर** :- आजपर्यंत मनपा क्षेत्रामध्ये दरवर्षी जवळपास १०० ते १५० बैठकीचे शौचालय सार्वजनिक ठिकाणी बांधण्यात येत असत. मनपाने सविस्तर अहवाल महाराष्ट्र शासन व एम.एम.आर.डी.ए. ला सादर केला, MMRDA आयुक्त मा. श्री. गायकवाड साो. यांनी धोरणात्मक निर्णय घेऊन १०० % अनुदान एकाच वेळी मंजुर करून एम.एम.आर.डी.ए. ने निर्मल एम एम आर अन्वये आपल्या शहरामध्ये एकाच वेळी ३ हजार बैठकीचे शौचालय त्यांच्या अनुदानातून बांधलेले आहे. यासाठी मनपावर कुठलाही आर्थिक बोजा पडलेला नाही. व शहरातील मोठया प्रमाणावर नागरीकांची सोय होऊन हगणदारी मुक्त शहर होण्यासाठी मोठयाप्रमाणावर हातभार लागलेला आहे. “P” बजेटमध्ये यावर्षीदेखील १५ कोटी रूपयांची कामे प्रस्तावित केलेली आहेत. मनपास शौचालये, मुताऱ्या यावर दरवर्षी खर्च करावा लागत असे. या खर्चात मोठी कपात झालेली आहे.

४) **मोनोरेल/मेट्रो/स्काय बस** :- मोनोरेल, मेट्रो स्काय बस हे आपल्या मनपा क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए. द्वारे राबविण्यासाठी आपल्या मनपाचा समावेश एम. एम.आर.डी.ए.मध्ये करून घेण्यात आलेला आहे.

५) **विरार – दहिसर लिंक रोड** :- वसई, विरार, भाईंदर व दहिसर अशा प्रकारचा लिंग रोड व्हावा यासाठी एम.एम.आर.डी.कडे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

६) **B.S.U.P. योजना** :- केंद्र सरकारने मनपा क्षेत्रातील ४ ठिकाणच्या झोपडपट्टीवासियांसाठी बी.एस.यु.पी.च्या माध्यमाद्वारे ४१३६ घरे बांधून देणेसाठी मान्यता दिलेली असून या कामाची निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या कामाचा एकूण खर्च २७९ कोटी असून यामध्ये ५० टक्के वाटा केंद्र सरकार उचलेल, ३० टक्के राज्यसरकार देईल, ९ टक्के संबंधित लाभार्थी वर्गणी व ११ टक्के मनपा हिस्सा असे मानक आहे. त्याची विगतवारी पुढीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) केंद्र/राज्यशासन अनुदान | २२३.२० कोटी | १११.६० कोटी |
| २) मनपाचा हिस्सा | ३०.६९ कोटी | १५.३५ कोटी |
| ३) लोक वर्गणी | २५.११ कोटी | १२.५५ कोटी |
| **एकूण** | **२७९.०० कोटी** | **१३९.५० कोटी** |

सदर योजना दोन वर्षात पूर्ण करावयाची आहे. त्याची विगतवारी खालीलप्रमाणे परंतु मनापा निधी अभावी “P” बजेटमध्ये सन २०१०-११ यावर्षी अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे.

**१) केंद्र/राज्यशासन अनुदान - ४८.२१ कोटी**

**२) मनपाचा हिस्सा - ६.६२ कोटी**

**३) लोक वर्गणी - ५.४२ कोटी**

७) **वाहनांवरील खर्चात कपात** :- आपल्या मनपाकडे रूग्णवाहिका, लहान कार, जीप, शववाहिनी, जेसीपी, डंपर,टेम्पो,अशी लहानमोठी ८२ वाहने कार्यरत आहेत. या वाहनांवर मागील पाच वर्षामध्ये झालेला खर्च याप्रमाणे.

| सन | वाहन दुरूस्ती खर्च |
|---|---|
| २००५-०६ | रु. ५५,०१,७४९/- |
| २००६-०७ | रू. ८७,१९,१८५/- |
| २००७-०८ | रू. १,१७,१८,८६४/- |
| २००८-०९ | रू. २७,९०,५०९/- |
| २००९-१० ( २२ फेब्रुवारी २०१०) | रू. १३,४२,०२३/- |

वरील तक्त्यांचे अवलोकन करता वाहन दुरूस्तीवर खुप मोठया प्रमाणावर खर्च झालेला आहे हे दिसून येते. हि वाहने जुनी झालेली असल्याने खर्चात वाढ होणे अपेक्षित होते. असे असतांना या खर्चावर योग्य नियंत्रण ठेवल्याने हा खर्च १३.५० लाखावर कमी झालेला आहे हे दिसून येते.

८) **ॲमिनिटी ओपन स्पेस** :- यामध्ये समाजमंदिरे, सिनियर सिटीजन, बालकांचे पालन पोषण केंद्र, वृध्दांसाठी वृध्दाश्रम विकसित करावयाचे आहेत. मनपावर कुठलाही आर्थिक बोजा न पडता अशा जागा विकसित करण्याचा मानस आहे.

९) **फेरीवाले** :- भाजी, फळ, मटन व मच्छी मार्केट बांधणे मनपाचे कर्तव्य आहे. त्यासाठी वेगवेगळया ठिकाणी असलेले आरक्षण विकसित केल्यास १५ वर्षावरील वास्तव्य असणाऱ्या फेरीवाल्यांचे बसण्याची व्यवस्था होऊ शकेल. दोन ठिकाणची आरक्षण विकसित करण्यात येत आहेत. तसेच सर्व मार्केटची आरक्षणे ताब्यात घेऊन मार्केट बांधल्यास फेरीवाल्याचे प्रश्न निकाली काढता येईल.

१०) मा. सुप्रिम कोर्टाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे शासनाचे मंजुरीने रस्ते व नाले ज्यांची जागा असेल त्या जागा मालकांनी विकसित केल्यास F.S.I./ TDR देण्यांत येणार आहे. एका रस्त्यावर ५० ते १०० जागा मालक असतील तर एकाच वेळी सर्व मालक रोड बांधू शकणार नाहीत. त्यामुळे रोड एकाच वेळी एकजिनसी होणार नाही. त्यासाठी सर्व डी.पी. रोड व नाले R.C.C. करून घेणेसाठी मा. महासभेच्या व शासनाच्या मंजुरीने निविदा काढून करणेचे विचाराधीन आहे.

११) **आय. एस. ओ. ९००१-२०००** :- महापालिकेने इंटरटेक या संस्थेकडे १/८/२००७ रोजी आय.एस.ओ. ९००१-२००० हे प्रमाणपत्र लेखापरिक्षण विभागास प्राप्त होण्यासाठी नोंदणी केलेली होती. या संस्थेने या कालावधीपासून महानगरपालिकेच्या लेखापरिक्षण विभागाची तपासणी चालू ठेवलेली होती. त्यानुसार आवश्यक बाबींची पूर्तता केल्याने महानगरपालिकेस दि. ३/११/२००९ पासून आय.एस.ओ. ९००१-२००० प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

## JNNURM मधील प्रकल्प.

### JNNURM अंतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेले प्रकल्प.

| अ.क्र | प्रकल्पाचे नांव | प्रकल्पाची किंमत | प्रकल्पाच्या खर्चाची हिस्सेवारी (रक्कम रू. कोटीमध्ये) | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | केंद्र शासनाचा हिस्सा | राज्य शासनाचा हिस्सा | मनपाचा हिस्सा | |
| १ | भुयारी गटार योजना | ~~३३१.४२~~ ४९१.९८ | ११५.९९ | ४९.७१ | ३२६.२८ | काम प्रगतीपथावर आहे. |
| २ | बसेस खरेदी | ११.०० | ३.८५ | १.६५ | ५.५ | कार्यादेश दिले आहेत. |
| ३ | बी.एस.यु.पी. प्रकल्प फेज -१ | २७९.५५ | ११४.२९ | ७८.५६ | ७२.३४ | **PMC** साठी निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. |
| | **एकुण** | **७८२.५३** | **२३४.१३** | **१२९.९२** | **४०४.१२** | |

### JNNURM अंतर्गत राज्य शासनाने मंजूर केलेले प्रकल्प.

| अ.क्र | प्रकल्पाचे नांव | प्रकल्पाची किंमत | प्रकल्पाच्या खर्चाची हिस्सेवारी (रक्कम रू. कोटीमध्ये) | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | केंद्र शासनाचा हिस्सा | राज्य शासनाचा हिस्सा | मनपाचा हिस्सा | |
| १ | रस्ता प्रकल्प | १०८.२५ | ३७.८८ | १६.२३ | ५४.११ | राज्य शासनाची मंजुरी प्राप्त असुन प्रकल्प एम.एम.आर.डी. मार्फत केंद्र शासनास सादर करावयाचा आहे. |
| २ | इ- गव्हर्नस प्रकल्प | १२.२५ | ४.२८ | १.८३ | ६.११ | केंद्र शासनास सादर केलेला आहे. |
| ३ | घनकचरा प्रकल्प | ७१.३० | २४.९७ | १०.७० | ३५.६७ | केंद्र शासनास सादर केलेला आहे. |
| ४ | स्टॉम वॉटर ड्रेन प्रकल्प | २८९.६६ | १०१.३८ | ४३.४५ | १४४.८३ | केंद्र शासनास सादर केलेला आहे. |
| | **एकुण (ब)** | **४८१.४६** | **१६८.५१** | **७२.२१** | **२४०.७२** | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र शासनाने व राज्य शासनाने मंजुर केलेल्या प्रकल्पांची एकूण किंमत | | | | ११९४.६० | |

१) एकूण ५ झोनच्या Collection System चे Hydraulic design मंजूर झाले आहे.

२) एकूण ५ झोनच्या STP चे मंजूर Hydraulic design झाले आहे.

३) एकूण ७.५ किलो मीटर पाईपचा पुरवठा झाला आहे.

४) एकूण ०.६१० किलो मीटर पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे.

**१२) पाणी योजना :-** पाणी पुरवठा योजना ११०० कोटी रुपयांची महाराष्ट्र शासनाने मंजुर करून ग्ग्डक़्रॠ कडे पाठविलेली आहे. सन २००१ च्या जनगनणे प्रमाणे मिरा भाईंदरची लोकसंख्या ५ लाख २० हजार इतकी आहे. तर सध्या अंदाजे ९ लाख ५० हजार इतकी झालेली आहे. ९१ **MLD** उपलब्ध पाणीपुरवठा नुसार सध्या शहरास ४० तासातून एकदा पाणी पुरवावे लागत आहे. त्यातुन वाढणारी लोकसंख्या विचारात घेता हि योजना तातडीने घेतली नाहीतर चार चार दिवस पाणी मिळणेदेखील कठिण होवून बसणार आहे. सदरची योजना पुढील वीस वर्षातील लोकसंख्येचा दुरदृष्टीने विचार करूनच हाती घेण्यात आला आहे.

पाण्यासाठीचा जनआंदोलनाचा पूर्व इतिहास आपणा सर्वांना माहितच आहे. याकडे कानाडोळाकडून चालणार नाही. असंतोषाचा भडका उडून कायदा व सुव्यवस्था परिस्थिती निर्माण होवू नये म्हणून ११०० कोटी रूपयांची पाणी योजना प्राधान्याने राबविणे निकडीचे आहे. खर तर हि योजना यापूर्वीच हाती घ्यायला पाहिजे होती. कारण इतर महानगरपालिकेचा विचार करता त्यांच्याकडे २-२ स्त्रोत उपलब्ध आहेत. परंतू आपल्या शहराला असा एकच स्त्रोत उपलब्ध असल्याने नविन पाणी पुरवठा योजना राबविणे अत्यंत गरजेचे आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता अत्यावश्यक सेवा म्हणून पाणीयोजना राबविण्यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य मिळाल्यास मुदतीपूर्वी योजना राबवून नागरीकांचे पाण्यासाठी होणारे हाल थांबतिल, अन्यथा मागील उजळणी होवून पाणी जन आंदोलनाचा असंतोषाचा उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. हे सर्व करतांना आपले उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे तितकेच गरजेचे आहे. त्यामुळे सदरची योजना बी. ओ. टी. तत्त्वावर राबविणे आवश्यक आहे.

नागरी जीवन सुकर, सुसहय व समृध्द करण्यास महापालिका वचनबध्द आहे. सर्व बाजूंनी शहराचा विकास साधून स्वच्छ सुंदर व हरित मिरा भाईंदर बनविण्याचा माझा प्रयत्न आहे.

मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती, स्थायी समिती, मा. सभागृह नेते, मा. विरोधीपक्ष नेते, सन्मानिय नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी, पत्रकार, विचारवंत नागरीक, मिरा भाईंदरची जनता व सर्व संबंधित हयांचे सहकार्याची मी अपेक्षा करतो. तसेच आजपर्यंत आपणाकडून जे सहकार्य लाभले. याबद्दल आपणा सर्वांचे आभार मानतो.

**धन्यवाद !**

**दिनांक : २५/२/२०१०**

**(शिवमुर्ती नाईक)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

यापुढेही असेच सहकार्य लाभावे अशी विनंती करुन अंदाजपत्रकाचे काय काय करता येईल आणि काय काय करायला पाहिजे? आपणसुध्दा दरवाढ केली असती. तर ह्या सर्व गोष्टी घडल्या असत्या. परंतु, सध्या जी महापालिकेच्या पाणी आणि भुयारी गटार योजना आणि बी.एस.यू.पी. यामध्येच आपली वर्गणी घालण्याची आता आपली कुवत नाही. २२६ कोटीचे कर्ज काढलेले आहे. कर्जाची परतफेड करायची आहे आणि पाणीपुरवठा योजनापण हाती घ्यायची आहे. या सर्व दृष्टीकोनातून दरवाढ केल्याशिवाय गत्यंतर नाही. तरी सर्व सन्मा. सभासदांनी आणि मा. स्थायी समितीने विचार करावा अशी नम्रतेची विनंती आहे.

**मा. सभापती :-**

धन्यवाद मा. आयुक्त साहेब.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, फक्त एका मुद्यावर स्पष्टीकरण द्या. ही पाणी योजना ही बी.ओ.टी. वर द्यायची आहे. साधारण तुमच्या मनामध्ये काय आहे? ते अशाप्रकारे मटेरीयलाईझ करायचे आहे?

**मा. आयुक्त :-**

माझ्या डोक्यात असा विचार आहे की, केंद्र शासनाकडून ३५ टक्के मिळणार आणि १५ टक्के स्टेट गव्हर्नमेंट आहे. ११५० कोटीची योजना आहे. साडेपाचशे कोटी स्टेट गव्हर्नमेंट आणि सेंट्रल गव्हर्नमेंटकडून मिळतील. साडेपाचशे कोटी रुपये घालून, स्कीम इम्प्लीमेंट करुन जो मालक ३० वर्षासाठी ठेवेल आणि आत्ता ११०० कोटी काय दराने तुम्ही आम्हाला पाणी देणार? ९०० ला काय देणार? ५०० ला काय देणार? आत्ता

शहाड टेमघर पाणी पुरवठ्याकडून आपण जे पाणी साडेचार रुपये दराने घेतो. त्याप्रमाणे इम्प्लीमेंट करणाऱ्या संस्थेने ११०० कोटी इन्व्हेस्टमेंट करुन आम्हाला काय दराने पाणी देणार? नंतर त्यांनी ९०० कोटी गुंतवले तर काय दराने पाणी देणार? मग आम्ही तुम्हाला साडेपाचशे देणार आहे, मग काय दराने पाणी देणार? आणि जर तुम्ही साडेपाचशे कोटी घालण्या एवढा दर वाढवला तर आपणच ते इम्प्लीमेंट करु. म्हणजे दोन्ही पैकी एक ठेवलेले आहे. म्हणजे महापालिकेने करायचे असेल, कुठलीही योजना करताना, एखादी कंपनी काढायला लागली, कंपनी काढायच्या वेळेला शेअर गोळा करतो आणि भागभांडवला तयार झाल्यानंतर राहिले आपण कर्ज घेउन करतो. हे लाभकर म्हणजे पुढे येणाऱ्या योजनेचा लाभकर आत्तापासूनच घ्यायला सुरु करायला पाहिजे असते. अंडरग्राउंडचे ड्रेनेजचे काम आत्ता सुरु झाले आहे. अंडरग्राउंड ड्रेनेजचा लाभकर आत्तापासूनच प्रॉपर्टी, कारण ५ टक्केने जरी वसुल करायचे म्हणजे १३ कोटी होणार आहेत. आत्ता ४९१ कोटी रिकव्हरी करायला किती वर्ष लागतील? आत्ता पाणी पुरवठा लाभकर जरी ५ टक्के केला तरी १३ कोटीच मिळणार आहेत. १३ कोटी प्रमाणे ११०० कोटीपर्यंत जायला किती वर्ष लागतील? म्हणजे लाभकर आतापासूनच सुरु करायला लागेल आणि आपण जो कर आकारणी करतो, समजा पाणीपट्टी आहे, पाणीपट्टी ही आताची योजना जे आपण पाणी देतो त्याचे मेन्टेनन्स आणि स्टेमकडे पाणीपट्टी भरण्याचे, जे आपण दर महिन्याला भरतो. त्याची व्यवस्था आणि मेन्टेनन्स आणि पाणी पुरवठा, हे पाणीपट्टीतून वसूल होतील. लाभकर ही योजनेसाठी आहे.

**प्रविण पाटील :-**

साहेब, आपल्याकडे सध्या कोणती योजना आहे.

**मा. आयुक्त :-**

सुर्याची आहे. आत्तापर्यंत आपल्याला सोर्स मिळत नव्हता. आता श्री. अजितदादा साहेबांना इरिगेशनची परवा इलेक्शन पूर्वी मिटींग झाली. त्यामध्ये मिरा भाईंदरसाठी १०० एम.एल.डी. मंजूर केलेले आहेत आणि एमएमआरडीए च्या मा. आयुक्त साहेबांनी १०० एम.एल.डी. मंजूर केलेले आहेत. त्यामुळे २०० एम.एल.डी. ची योजना आपण प्रस्ताव स्टेट गव्हर्नमेंटकडे सादर करुन, स्टेट गव्हर्नमेंटने मंजूरी देवून एमएमआरडीए कडे केंद्र शासनाकडे पाठवायला सादर केलेले आहे.

**प्रविण पाटील :-**

सुर्याची. तिकडच्या लोकांचे ऑब्जेक्शन वगैरे नाही ना?

**याकुब कुरेशी :-**

बारवी डॅममधून पाणी उचलण्याचे चालले होते ना?

**मा. आयुक्त :-**

तो फार लांब होतील आणि ही योजना आपल्याला ग्रॅव्हीटीने पुरुन जाईल.

**याकुब कुरेशी :-**

सुर्या प्रकल्प हा आपल्यापासून किती किलोमीटरवर आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

आपल्यापासून साधारणतः ६० किलोमीटरवर आहे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

तितके पाणी मिळेल का?

**शिवाजी बारकुंड :-**

पाणी आहे म्हणूनच आरक्षण दिलेले आहे आणि वेस्टर्न सबर्बनसाठी सुर्या धरण आहे आणि बारवी आणि इतर सगळे ईस्टर्नसाठी आहेत असे गव्हर्नमेंटने केलेले आहे. त्यामुळे आपल्याला सुर्यामधून मिळते.

**मा. आयुक्त :-**

आणि आपल्याला फिल्टरेशन प्लान्ट तिथेच केला तर ग्राव्हीटीने पाणी येईल. इलेक्ट्रीक बील वाचेल.

**जुबेर इनामदार :-**

आपल्याला तो टॅक्स घरपट्टीमध्ये लावावा लागेल. मग कसे करणार? त्याला मान्यता मिळाली नाही.

**मा. आयुक्त :-**

आत्ता बसून निर्णय घेउन वाढवावे लागणारच आहे. एस.टी.पी. चे वाढवावे लागेल, पाणीपट्टी लाभकर वाढवावे लागेल आणि १९९६ मध्ये प्रॉपर्टी टॅक्सचे रेट वाढले आहेत आणि आपण आत्ता जरी वाढवले तरी ते नवीन येणाऱ्या बांधकामासाठी लागणार आहेत.

**जुबेर इनामदार :-**

प्रोव्हीजन आहे का? कारण ३० तारखेपर्यंत करायला पाहिजे होते.

**मा. आयुक्त :-**

२० तारखेपूर्वी करायचा उद्देश होता की, तो बजेटमध्ये रिफ्लेक्ट व्हावा.

**मा. सभापती :-**

साहेब, माझी एक सुचना आहे. आपण करवाढीचा प्रस्ताव जेव्हा आमच्या स्टॅन्डीगला दिला. तुम्ही माझ्याकडे प्रस्ताव ठेवला, मी ताबडतोब सही केली. स्टॅन्डीगला मी तो विषय घेतला. आमच्या कोणत्याही

नेत्यांचा आदेश वगैरे न विचारता किंवा त्यांचा सल्ला न घेता मी ताबडतोब विषय घेतला. साहेब, तुम्ही या ठिकाणी असताना मला एक विशेष वाटते की, तुम्ही एवढ्या उशीरा ते प्रकरण आमच्याकडे आणले. त्यानंतर तोपर्यंत पूर्णपणे माहिती घेता आली नाही. हा विषय मा. महासभेत वगैरे अगोदर झाला असता आणि या शहराच्या लोकप्रतिनिधींना हा प्रस्ताव नामंजूर नव्हता. आमचे काही विरोधक असतील, त्यांना असेल. परंतु, जो विषय आपण मा. महापौरांनकडे आपण हा कर दरवाढीचा विषय मा. महासभेत घेण्यासाठी ठेवलेला. साहेब, मी देखील आपल्याला या संदर्भात विचारणा केलेली. तुम्ही बोलले होते की, हा विषय आपण मा. महासभेमध्ये मंजूर करतो. तो परत का आला नाही, काय प्रॉब्लम झाला? त्याच्याबद्दल थोडीशी चर्चा झाली, पण आज ही वेळ आली नसती जर हा विषय आपण अगोदरच घेतला असता, तर आज आम्ही याला मंजूरी दिली असती आणि दुसरी गोष्ट अशी आहे की, आम्ही जरी स्टॅन्डीगला करवाढ दिली असती, तरी शेवटी मा. महासभेच्या मंजूरीशिवाय तो मंजूरच होत नव्हता. म्हणजे आज आपल्या शहराचे दुर्देव आहे की, आम्हाला इकडे अशा पध्दतीचे मा. महापौर भेटले आणि आम्हाला प्रस्ताव आहे त्या हिशोबाने आज आपल्याला बजेट समाविष्ट करुन घ्यावा लागतो. आज आपल्या शहराला एवढ्या चांगल्या योजना मिळत आहेत. याच्यामध्ये सेंट्रल गव्हर्नमेंटचे सहकार्य आहे. स्टेट गव्हर्नमेंटचे सहाकार्य आहे. श्री. मदनजी मै आपको बताता हू, इको हाससिंग नेहरु सेंटरमध्ये १६ तारखेला मा. मुख्यमंत्र्यांनी सेमिनार आयोजित केलेला त्याच्यामध्ये स्वतः मा. मुख्यमंत्री साहेबांनी निवेदन दिलेले की, आज सेंट्रल गव्हर्नमेंट, स्टेट गव्हर्नमेंटच्या ज्या स्कीम मिळतात ह्या प्रत्येक नगरपालिका, महानगरपालिकेने राबवल्या पाहिजेत. परंतु, काही महानगरपालिकेमध्ये आर्थिक बाबतीमुळे हे राबवू शकत नाहीत. एक महानगरपालिका होती की, तिथे आपण हे सगळे प्रस्ताव आणलेले आहेत आणि आपण मंजुर करतो. त्याबाबतीत काम करतो. प्रत्येक महानगरपालिकेमध्ये दहा वर्षापूर्वी करवाढ झालेली आहे. मा. मुख्यमंत्री साहेबांनी त्या ठिकाणी सांगितले. मी होतो, श्री. खांबित साहेब, श्री. बारकुंड साहेब होते, मा. आयुक्त साहेब होते. त्या ठिकाणी इको हाउसिंगमध्ये ग्रीन बिल्डींगचा प्रस्तावामध्ये सेमिनार दाखवला. पूर्ण दिवस सेमिनार चाललेला. मा. महापौर साहेब तिकडे आलेले नव्हते. पण बाकीचे म्हणजे तीन एक हजार लोक पूर्ण महाराष्ट्रामधून आलेले. अतिशय चांगले सेमिनार झाले. त्याच्यामध्ये मा. मुख्यमंत्र्यांनी प्रस्ताव ठेवला की, निवडणूका आत्ता अडीच तीन वर्षांवर आहेत. प्रत्येक महानगरपालिकेने पाणीपट्टी वाढ, करवाढ करावी जेणेकरुन तुमच्या ज्या स्कीम आहेत या तुम्हाला चांगल्यापैकी राबवता येतील. शहराचा विकास होईल. तेव्हा कोणतीही एकटी महानगरपालिका स्वतःच्या ताकदीवर कुठलीही स्कीम राबवू शकत नाही. पण आज आपले अशा पध्दतीने धोरण झाले की, आत्ता बजेटमध्ये ती वेळ पण निघून गेली. तरी देखील कमिशनर साहेब, आपल्या अखत्यारीमध्ये याच्यावर काही असेल तर आम्ही या सगळ्या गोष्टीला तयार आहोत. साहेब, तुम्ही हा प्रस्ताव स्टॅन्डीगला एवढ्या उशीरा कसा आणला तेच कळत नाही.

**मा. आयुक्त :-**

उशीरा दिला नाही कारण आपण दरवाढीचा विषय दिल्यानंतर त्यावर चर्चा करायची नाही असे म्हणाले. कारण चर्चा न करता पाठवायचे तुम्ही ठरवले. तुम्ही चर्चा केली असती तर त्याची सगळी उत्तरे दिली असती. गटनेत्यांची मिटींग बोलवा, चर्चा करा आणि मा. महासभा लावून वाढवून द्या.

**मा. सभापती :-**

साहेब, पुन्हा स्टॅन्डीगला विषय आणून एकदा तिकडे पाठवला आहे. साहेब, आत्ता मा. महासभेचे काही असेल तर आत्ता नवीन मा. महापौर आलेले आहेत. मा. महासभेमध्ये प्रस्ताव ठेवा.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब, मा. स्थायी समितीच्या सदस्यांनी पत्र दिले होते की, मा. महापौरांनी मिटींग लावावी.

**प्रविण पाटील :-**

साहेब, महासभेत आत्ताही घेउ शकतो ना?

**मा. सभापती :-**

होय. आत्ता आपण जर विशेष मा. महासभा लवकर लावून......

**मा. आयुक्त :-**

गटनेत्यांची मिटींग घेउन चर्चा करु आणि मग मिटींग घेउ.

**मा. सभापती :-**

साहेब, हे तुमच्या आमच्यासाठी नाही. शहरातील नागरीकांचा प्रश्न आहे, लोकप्रतिनिधींचा प्रश्न आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, पाणी पुरवठ्याचा विषय सर्वात महत्वाचा आहे. कारण ही योजना पुढे धोरण लावले म्हणून जर आत्ताच केली नाही, योजना व्हायला ३-४ वर्ष जातील. आपण ९८-९९ ला घेतलेली योजना २००२ मध्ये कम्प्लीट झाली. ते अजून अपूर्ण आहे. टाक्यापण बांधलेल्या नाहीत. तर योजना हाती घेउन पाणी यायला कमीत कमी ४-५ वर्षे जातात आणि शहाड टेमघरची पाईप लाईन टाकलेली होती. आमच्यापर्यंत यायला वेळ लागली नाही. पण ही योजना आपण पूर्ण करायची आहे. सुर्यापासून लाईपलाईन आणि फिल्टरेशन प्लान्टला कमीत कमी तीन वर्ष लागणार. आत्ता आपण ४० तासांवर आहोत आणि शटडाउन घेतल्यानंतर आपण ७०

तासांवर आहोत. तर ही योजना जर आत्ताच घेतली नाही, तर लोक आपल्याला माफ करणार नाहीत. कारण ही योजना राबवायला तीन वर्ष जाणार. तीन वर्षात आपल्याकडे एक लिटर पाणीवाढ कुठलीच होणार नाही. लोकसंख्या वाढेल पण पाणीवाढ होणार नाही.

**मा. सभापती :-**

मागे इकडे आंदोलन झालेले. ते आंदोलन एवढे भयानक होते. आत्ता तुम्ही ज्या पध्दतीने बोलता की, स्कीम इथे चालु होईपर्यंत ५ वर्षे लागतील. तर मला वाटते की, ती परिस्थिती चांगली म्हणता येईल. पुन्हा प्रायव्हेट टँकर आत्तापासूनच चालु झाले आहेत आणि याचा कुठे तरी, कनेक्शन देणे किंवा काय याचा निर्णय आपल्याला घ्यावा लागेल. नळ कनेक्शन बंद करावे लागतील. नाही तर जर ५ वर्षे पाणी येणार नसेल तर शहराची पाण्यासाठी पहिल्यापेक्षा खराब अवस्था होईल.

**मा. आयुक्त :-**

त्यामुळे अंडरग्राउंड ड्रेनेजपूर्वी टॉप प्रायोरीटीवर पाणी पुरवठा घ्यावा लागेल. पाणी पुरवठा घेतल्याशिवाय या महापालिकेत गत्यंतरच नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

पानी बढ नही रहा है। उसी पानी मे कनेक्शन बढानेसे क्या फायदा? नल से पानी आएगा ही नही, तो खाली कनेक्शन क्यों देने का?

**मा. सभापती :-**

याच्यावर विचार करायला लागेल. मा. महासभेत तो विषय घ्यावा लागेल.

**मा. आयुक्त :-**

गटनेत्यांची मिटींग बोलावू. आपण पहिल्यांदा ठरवू की, कोणत्या कोणत्या दराने द्यायचे. चर्चा करत बसले तर तिथेच होत राहील. कुठल्या स्टेजला आपण दरवाढ करायची याची चर्चा करु. चर्चा झाल्यानंतर मग मा. महासभा बोलवू, असे मला वाटते.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब, आपण निवेदन वगैरे केलेले आहे. आपली बजेटवर चर्चा झाली. मला वाटते आपण दोन तारखेपासून २,३,४,५ हे दिवस आपण मॅरेथॉन बैठक ठेवून आमच्या स्टॅन्डीगमध्ये बजेटदेखील मंजूर करुन आपण मा. महासभेमध्ये सादर करु. साहेब, आमचे सगळे विषय झालेले आहेत. परंतु, एका विषयावर आम्ही फक्त मंजुरी दिलेले आहे, आरोग्य, कॉन्ट्रॅक्टरच्या बाबतीत निविदेला आम्ही मंजुरी दिलेली आहे. पण चर्चेचा विषय आम्ही शिल्लक ठेवलेला आहे. आम्ही आपली वाट बघत होतो. मी सर्व सन्मा. सदस्यांनी विनंती करतो की, आपण आरोग्याच्या बाबतीत जर काही विचार मांडायचे असतील तर आपण......

**बर्नट डिमेलो :-**

आपल्या मागच्या विषयावर, कराबद्दल ज्या गोष्टी झाल्या त्याबद्दल मा. आयुक्तांना विचारायचे होते. ब-याचशा घरांना, म्हणजे त्या घरांमध्ये बदल केला, त्याने रिपेअरींग केली त्यांना आपण शास्ती लावलेली आहे. टॅक्स वाढला त्याबद्दल लोकांना त्रास नाही. पण जी शास्ती भरतात ती कायम स्वरुपी राहिल की, एक वर्षासाठी, ते कसे काय? कारण आपण सुरुवातीला जो शास्ती लावण्याचा निर्णय त्यावेळी फक्त व्यावसायीक आणि जे बिल्डर बांधतात आणि बांधून ठेवतात त्यांना शास्ती होती. पण आत्ता गावांनापण वगळले नाही. ग्रामपंचायत काळापासून कायमस्वरुपी राहणारे लोक आहेत त्यांना पण शास्ती लावण्यात आलेली आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब, आपण ठरावामध्ये गावठण वगळले होते.

**हेलन गोविंद :-**

गाव वगळलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

वगळता येणार नाहीत. कारण गावठण वेगळे आणि बाहेरचे वेगळे असे करता येणार नाही. विकासक आणि राहणारे लोक हे पण वेगळे करता येणार नाहीत. कायदा सर्वांना सारखा असतो.

**बर्नट डिमेलो :-**

पण त्या शास्तीचा पिरीएड म्हणजे......

**मा. आयुक्त :-**

शास्तीचा पिरीएड म्हणजे एखाद्या शर्टला होल पडले तर ते बुझवायचे काम असेल तर त्याला दुरुस्ती म्हणतात. चारही भिंती काढून छप्पर बदलणे याला दुरुस्ती म्हणत नाहीत. नवीन घरच म्हणतात. जिथे प्लास्टर आणि कौल, पत्रे बदलले असतील तेवढे बदलू. परंतु, चारही भिंती आणि छप्पर काढल्यानंतर त्याला तुम्ही कसली दुरुस्ती म्हणणार?

**बर्नट डिमेलो :-**

पण कोसळणारे घर असेल......

**मा. आयुक्त :-**

ते कायम स्वरुपाचे तिप्पट राहणार.

**बर्नट डिमेलो :-**

जर त्यांचे पडक्या अवस्थेमध्ये आहे त्यांच्या जिविताला धोका आहे आणि काही मातीची घरे आहेत, कौलारु आहेत ती तोडून जर रिपेअर केले तर रिपेअरिंगच पकडावे लागेल.

**मा. आयुक्त :-**

रिपेअरिंग कशाला म्हणतात?

**बर्नट डिमेलो :-**

जुन्या घराचे नवीन करतील.

**मा. आयुक्त :-**

मग नवीन घर बांधले की, नवीन टॅक्स. परवानगी न घेता बांधले की, नवीन टॅक्स. त्याला बांधकाम परवानगी आणि भोगवटा दाखला हे दोन असतील तर नियमाप्रमाणे टॅक्स लागणार. बांधकाम परवानगी आणि भोगवटा दाखला ज्याला नाही त्याला तिप्पट कर लागणार.

**बर्नट डिमेलो :-**

आमच्या इकडे काही कागदाची पुर्तता......

**मा. आयुक्त :-**

त्यावर अजून विचार करायला लागलो आहे. सरकारी जागेवर असेल तर दहापट करायला पाहिजे. कारण जमिनीचे पैसे लागत नाहीत.

**बर्नट डिमेलो :-**

सरकारी नाही. खाजगी जागेतच आहेत. पण आर्कीटेक्ट आणि इतर गोष्टींची पुर्तता करायला गेले तर मला वाटते लोकांनी झोपड्यात राहिलेले परवडले, तो असा प्रकार होईल. गरीब माणसाने काय करावे?

**मा. आयुक्त :-**

स्वतःची खाजगी जागा असेल तर तिप्पट कर आहेच, बेकायदेशीर बांधले तर. शासनाच्या मालकीचे असेल तर तो वेगळा आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब, आपने अच्छा बजेट दिया। बजेट मे आपने पानी योजना लिखा है। पाणी योजना मे आपने यह भी लिखा है की, ९६ मे जन आंदोलन हुआ। तो उसी तरह पुरी बजेट मे आपने अभी जो अपने डंम्पींग ग्राउंड का बोला, अपने घनकचरा प्रकल्प का कही उल्लेख नही किया है। तो उसका भी इंतजार कर रहे है की, ९६ जैसा जन आंदोलन हो। उसके बाद ही करने का क्या? इसके बारे मे आपका क्या विचार है?

**मा. आयुक्त :-**

आपने जन आंदोलन किया है, आपके आदमी आए थे उनको मै मिलकर आया। उनसे दो घंटा बात हुयी। वही बात इधर करू?

**मदन उदितनारायण सिंह :-**

मै स्टँडींग की बात कर रहा हू, स्टँडींग का क्या रोल है।

**प्रविण पाटील :-**

साहेब हा साधा विषय नाही.

**अनिल सावंत :-**

साहेब, ते आंदोलन चालू आहे की, बंद आहे?

**जुबेर इनामदार :-**

साहेब, विल्हेवाट लावण्याकरिता प्रशासनाची भुमिका काय आहे?

**मा. आयुक्त :-**

आम्हाला बंदोबस्त द्यावा म्हणून प्रशासनाने एस.पी कडे पत्र दिलेले आहे. एस.पी. साहेबांनी सांगितले की, होळी संपल्यानंतर तुम्हाला बंदोबस्त देउ. कारण १ तारखेला होळी आहे आणि ३ तारखेला शिवसेनेची शिवजयंती आहे. ती संपल्यानंतर ५ तारखेनंतर देउ म्हणून सांगितले आहे.

**प्रविण पाटील :-**

तोपर्यंत काय?

**मा. आयुक्त :-**

आत्ताच कशी काय काळजी पडली? या पाच महिन्यात कशी काय काळजी पडली नाही? त्यावेळेला मतांच्या आशेवर होते. त्यावेळेला नागरिकांची काळजी नव्हती. मी एकटाच जबाबदार नाही. मी मा. महासभेमध्ये तुम्हाला सांगितलेले आहे की, सगळे काउन्सीलर सगळे अधिकारी सगळे मिळून जाउ. मा. महासभेत आपण नव्हते का?

**मदन उदितनारायण सिंह :-**

आपने चलने के लिये कहा बुलाया?

**मा. आयुक्त :-**

मैने सबको बोला था मा. महापौर, मा. उपमहापौर, सब काउन्सीलर, साहेब मी बोललो होतो की नाही?

**प्रविण पाटील :-**

तुम्ही बोलले पण त्याचे इम्प्लीमेंटेशन कुठे झाले आहे?

**मदन उदितनारायण सिंह :-**

आप बोलो कल चलने का है, हम लोग चलते है।

**मा. आयुक्त :-**

६ तारीख तारीख को जाने का है। आणि जनते बद्दल काळजी असेल तर ६ तारखेला याच. आम्ही तयार आहे. आम्ही कुठेही घाबरणार नाही आणि परत नागरिकांची काळजी तुम्हालाच दुसऱ्यांना नाही असे काही बोलू नका. साहेब, आत्ता वस्तुस्थिती अशी आहे की, लहान मुले आणि बायकांना घेउन, रस्त्यावर बसून वेलंकनी देवीची पुजा केली. आणि पुजा केल्यानंतर त्या लेडीज पोलिसांना त्या बायका हटेना म्हणून लाठीचार्ज झाला. लाठीचार्ज झाला तरी देखील त्या साडेतीन हजार लेडीज आणि हे फक्त २०० होते. त्यामुळे ते शक्य झाले नाही. शेवटी ऑर्डर विचारत होते की, फायरींग करायची का? आम्ही म्हटले, आम्हाला कोणाचा जीव घेउन कचरा पाठवायचा नाही ती वस्तुस्थिती सगळ्यांना माहिती आहे. पण सर्व पक्षांनी एकत्र बसुन, मुळात वास हा कचऱ्याचाच प्लान्ट आहे. दुसरा कुठला प्लान्ट असता तर. कचऱ्याचा प्लान्ट असल्यामुळे थोडाफार वास येणारच आहे. अलिबागच्या प्लान्टजवळ गेलात गेली ५० वर्षे १०० गावांना वास जातो. प्लान्टच त्याचा असल्यामुळे वास येणारच. पण हा जो वास आहे, ओपन कचऱ्यावर टाकल्यानंतर जो वास येतो तो शरीरावर इफेक्ट करणारा आहे. प्लान्टमधला वास हा शरीरावर इफेक्ट करणारा नाही. आणि दिवसातुन एखादा तास वास येतो. ऐवढे करायचे काही कारण नाही. आणि आमच्या प्लान्टमधील वासापेक्षा मच्छीचा वास जास्त येतो. त्यामुहे हा कचऱ्याचाच प्लान्ट असल्यामुळे त्याचा विचार करायचे कारण नाही. आणि साहेब, मुळ हेतु वेगळा आहे. प्लान्ट हा मुळ उद्देश नाही. कारण ज्यावेळेला आंदोलकांसमोर प्रास्ताविक भाषण झाले. त्या प्रास्ताविक भाषणामध्ये, आम्ही पहिल्यापासुन मच्छी वाळत घालत होतो. ती जागा आमच्या हातुन गेली याची खंत आहे. अशी बातमी आहे. मी म्हणत नाही जे बोलले त्यांची बातमी आहे.

**हेलन गोविंद :-**

जागेचे कोण बोललेच नाही.

**मा. आयुक्त :-**

मला म्हणायचे नाही. एखादे वेळेस असेल. परंतु, अशी बातमी प्रस्ताविकमध्ये आली आहे, असे तुम्हाला सांगतो.

**बर्नट डिमेलो :-**

असे पण विचार आले आहेत की, त्या जागेवर एखादे मोठे सुसज्ज असे हॉस्पीटल बांधा किंवा महानगरपालिकेने दुसरा प्रोजेक्ट करावा.

**मा. आयुक्त :-**

आत्ता जी चर्चा झाली होती ती चर्चा अशी होती की, पर्यायी जागा द्यायची. पर्यायी जागा दिली नाही तर तो प्लान्ट सुरू करायचा. आम्हाला पर्यायी जागा दाखवली त्या आंदोलनकर्त्यांनी त्याही जागेला विरोध केलेला आहे. त्या जागेला विरोध का केला की, ती ही सी.आर.झेड. मध्ये आहे. पर्यावरणाची हानी होते आणि जो जागामालक देणार आहे तो जागामालक फ्री काही देणार नाही.ते म्हणणार की, या जागेऐवजी ती जागा आम्हाला द्या, ही जागा तुम्ही घ्या. असेच होणार ना? त्यालापण त्या लोकांचा विरोध आहे.

**बर्नट डिमेलो :-**

त्याच्यामध्येही मोर्चे काढणार आहेत.

**मा. आयुक्त :-**

त्यामुळे पर्यायी जागेला पण हे तयार नाहीत. मग प्लान्ट सुरू केल्याशिवाय गत्यंतर नाही.

**हेलन गोविंद :-**

साहेब, आत्ता ज्या पार्टीने मोर्चा काढला त्याच पार्टीचे लोक तिकडे मोर्चा काढायला असतात.

**बर्नट डिमेलो :-**

जी पार्टी चालू करायला सांगते तीच पार्टी तिकडे विरोध करते.

**मा. आयुक्त :-**

आम्हाला जी पर्यायी जागा मिळाली त्या जागेवर आम्ही रोड करायला सुरू केले. रोड करायला सुरू झाल्यानंतर त्यांची पत्र यायला लागली की, तिथे केल्यास आम्ही आंदोलन करणार.

**हेलन गोविंद :-**

भाजपाचे नगरसेवक आहेत. त्यांनीच तिथे वातावरण तंग केले. आत्ता जागा शोधलेली मग हे त्यांच्या कानापर्यंत जाउ द्या. पब्लिकला हे सांगावे लागेल.

**बर्नट डिमेलो :-**

नवीन काढले की, तोडगा काढावा आणि कुठेतरी पर्यायी उपाय शोधावा. तो शोधल्यानंतर......

**हेलन गोविंद :-**

भाजपाचे नगरसेवकच तिथे नाटक करतात.

(सभागृहात गोंधळ)

**वर्षा भानुशाली :-**

इस विषय पर आम पब्लिक क्यो मर रही है, हर एक बिल्डींग के निचे कचरे का ढेर लगा है।

**मा. सभापती :-**

२८ तारखेला होळी येते आणि १ तारखेला धुलीवंदन आहे. होळीच्या निमित्ताने सर्व भाईंदर वासीयांना, सर्व सदस्यांना, सर्व प्रतिनिधी, नगरसेवक, कमिशनर साहेब, सचिव साहेब, सर्व अधिकाऱ्यांना हार्दिक शुभेच्छा देतो आणि ईद देखील २७ तारखेला आहे. ईदच्या देखील सर्व सन्मा. सदस्यांना, कमिशनर साहेब, सचिव साहेब, सर्व प्रतिनिधी, सर्व अधिकारी यांना देखील ईदच्या निमित्ताने हार्दिक शुभेच्छा देतो आणि आपली बजेटसाठी मॅरेथॉन बैठक २,३,४,५ या तारखेला लागेल. आपण सर्व सदस्यांचे बजेटच्या कामासाठी सहकार्य लाभो हीच या ठिकाणी विनंती.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, एक शोकप्रस्ताव आहे. आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेते, कॉंग्रेसचे नगरसेवक श्री. लक्ष्मण जंगम यांच्या मातोश्री गिताबाई गणपत जंगम यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मा. स्थायी समितीचे सर्व सन्मा. सदस्यांमार्फत त्यांना श्रद्धांजली.

**नगरसचिव :-**

सर्वांनी दोन मिनिटे जागेवर उभे राहुन मृतात्म्यास श्रद्धांजली वाहायची आहे.

**दुःखवटा ठराव क्र. ११७ :-**

आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेते, कॉंग्रेसचे नगरसेवक श्री. लक्ष्मण जंगम यांच्या मातोश्री कै. गिताबाई गणपत जंगम यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मा. स्थायी समितीचे सर्व सन्मा. सदस्यांमार्फत त्यांचा दुःखवटा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत** **अनुमोदक :- श्री. याकुब कुरेशी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व सन्मा. स्थायी समिती सदस्य, कमिशनर साहेब, सचिव साहेब, सर्व अधिकारी, आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पार पाडल्याबद्दल मी सर्व सदस्यांचे आभार मानतो आणि आजची सभा संपली असे जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०१.१५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**